# अनुसूचित जाती कल्याण समिती

**२०१५-२०१६**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

सातारा जिल्ह्यातील जिल्हा परिषद व नगरपरिषद, सातारा यांच्या सेवेतील अनुसूचित जाती प्रवर्गाचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा

# दुसरा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक ७ एप्रिल, २०१६ रोजी सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
**एप्रिल, २०१६**

# अनुसूचित जाती कल्याण समिती

**२०१५-२०१६**

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**सातारा जिल्ह्यातील जिल्हा परिषद व नगरपरिषद, सातारा यांच्या सेवेतील अनुसूचित जाती प्रवर्गाचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच अनुसूचित जातीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा**

# दुसरा अहवाल

एचबी ३१२१—१

## अनुसूचित जाती कल्याण समिती

(सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

(१) डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.

(३) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर भालेराव, वि.स.स.,

(५) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

(६) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.

(७) श्री. सुभाष साबणे, वि.स.स.,

(८) डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स.

(९) प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स.

(१०) श्री. नरहरी झिरवाळ, वि.स.स.

(११) श्री. इम्तीयाज जलील सय्यद, वि.स.स.

(१२) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१३) ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.

(१४) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.

(१५) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.





**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

---

सन २०१५-२०१६ या वर्षाकरिता मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी अनुक्रमे दिनांक १ मे, २०१५ व दिनांक २१ मे, २०१५ रोजी अनुसूचित जाती कल्याण समिती नामनिर्देशित केली आहे.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|---|
| (१) | प्रस्तावना | .. .. | (सात) |
| (२) | जिल्हा परिषद, सातारा | .. .. | १ |
| (३) | नगरपरिषद, सातारा | .. .. | १५ |
| (४) | परिशिष्ट " एक " (जिल्हा परिषद, सातारा व नगरपरिषद, सातारा यांच्याकडून समितीला प्राप्त झालेली माहिती). | .. | २१ |
| (५) | परिशिष्ट " दोन "(समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त) | .. | ४१ |




## प्रस्तावना

मी, अनुसूचित जाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

समितीने जिल्हा परिषद, सातारा व नगरपरिषद, सातारा येथे प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना व विशेष घटक योजनांसंदर्भात माहिती जाणून घेण्याचे ठरविले व त्यानुसार उपरोक्त विभागाच्या संदर्भात तयार केलेल्या प्रश्नावलीबाबतची माहिती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मागविण्यात आली.

समितीने उपरोक्त प्रश्नावलीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अनुक्रमे दिनांक २९ व ३० जून, २०१५ रोजी जिल्हा परिषद, सातारा व नगरपषिद, सातारा येथे प्रत्यक्ष भेट देऊन तेथील संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

समितीस पुरविण्यात आलेली लेखी माहिती व प्रत्यक्ष भेटीच्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी समितीसमोर दिलेल्या साक्षीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. प्रत्यक्ष भेटीच्या वेळी व विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी मिळालेल्या माहितीचा सर्वंकष विचार करून समितीने आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केलेल्या आहेत. परिशिष्ट " एक " मध्ये जिल्हा परिषद, सातारा व नगरपरिषद, सातारा तसेच परिशिष्ट दोन मध्ये समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त दिलेले आहे. समितीने दिनांक २९ मार्च, २०१६ रोजी प्रारूप अहवालावर विचार करुन तो संमत केला.

जिल्हा परिषद, सातारा व नगरपरिषद, सातारा यांच्या आस्थापनेवरील साक्षीच्यावेळी, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव (२), नगरविकास विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा, मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद व इतर संबंधित अधिकारी यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन जे सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २९ मार्च २०१६

**डॉ. सुरेश खाडे,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जाती कल्याण समिती.

# अहवाल

**जिल्हापरिषद, सातारा.**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीस प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २९ जून, २०१५ रोजी जिल्हा परिषद, सातारा या कार्यालयास भेट देऊन अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली.

समितीने जिल्हा परिषदेमध्ये अनुसूचित जातीच्या उमेदवाराची वर्ग-“ अ ” ते “ ड ” मधील तांत्रिक व अतांत्रिक पदे सरळसेवेने भरण्यासाठी अवलंबिण्यात येत असलेल्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती देण्याबाबत विचारणा केली असता जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली :—

जिल्हा परिषदेतील “ अ ” व “ ब ” वर्गातील पदांची भरती शासन स्तरावरून होत असते. तर “ क ” व “ ड ” वर्गातील तांत्रिक व अतांत्रिक पदांची भरती जिल्हा परिषदेच्या स्तरावरून होत असते. सदर पदे सरळसेवा व पदोन्नती या माध्यमातून भरण्यात येत असतात. सरळसेवा भरती शासनाच्या नियमाप्रमाणे होत असते व पदोन्नतीसाठी जिल्हा परिषदेच्या सेवा प्रवेश नियमावलीनुसार नियुक्ती होत असते. सर्व पदांसाठी असलेले रोस्टर तपासणीसाठी विभागीय आयुक्त कार्यालयात असलेल्या मागासवर्गीय कक्षाकडे पाठविण्यात येते. त्यानंतर पदोन्नतीची प्रक्रिया राबविण्यात येते. एकूण पदांच्या चार टक्के किंवा रिक्त पदांच्या ५० टक्के भरती करणे अपेक्षित आहे. एकूण पदाच्या चार टक्के किंवा रिक्त पदाच्या ५० टक्के जी संख्या कमी असेल त्याप्रमाणे भरती करावी अशाप्रकारच्या मार्गदर्शक सूचना वित्त विभागाकडून देण्यात आल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे जिल्हापरिषदेत भरती करण्यात येते. भरतीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आहे, त्या समितीमार्फत रिक्त पदांची भरती करण्यात येते. त्यासाठी परीक्षेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जातात. परीक्षेचे पेपर्स जिल्हाधिकारी सेट करतात. त्यानुसार परीक्षा घेण्याची यंत्रणा जिल्हापरिषदेमार्फत राबविण्यात येते.

समितीने, तांत्रिक व अतांत्रिक पदासाठी सेवा प्रवेश नियमानुसार चौथी उत्तीर्ण पेक्षा कमी अर्हता असेल अशा पदांसाठी उमेदवारांची लेखी परीक्षा घेऊन व दिनांक ५ जुलै २०१४ रोजीच्या परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनांनुसार उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेऊन दोन्ही परीक्षेच्या एकत्रित गुणवत्तेनुसार उमेदवारांची नियुक्ती केली जाते, चौथीपेक्षा कमी शैक्षणिक पात्रता असेल त्यांची व्यावसायिक चाचणी घेणे आवश्यक आहे, परंतु त्यांची लेखी परीक्षा घेणे योग्य आहे काय? असा प्रश्न उपस्थित केला असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनाच्या निर्देशाप्रमाणे लेखी व व्यावसायिक परीक्षा घेतली जाते, अशी माहिती समितीस दिली.

समितीने यावर " क " आणि " ड " वर्गातील तांत्रिक आणि अतांत्रिक पदासाठी चौथी उत्तीर्ण पेक्षा कमी अर्हता आहे. सरळसेवेद्वारे भरती करताना उमेदवारांची लेखी आणि व्यावसायिक चाचणी घेण्यात येते. या पदासाठी पात्र असलेले उमेदवार चौथीपेक्षा कमी अर्हतेचे असल्यामुळे अशा उमेदवारांची लेखी परीक्षा न घेता फक्त व्यावसायिक गुणवत्ता तपासून त्यांना नोकरीत सामावून घ्यावे असे मत मांडले.

समितीने, वर्ग " ड " संवर्गातील रिक्त पदे तसेच वरिष्ठ सहाय्यकांची (लेखा) एकूण किती पदे मंजूर आहेत, त्यापैकी अनुसूचित जातींच्या उमेदवारांसाठी किती पदे राखीव आहेत अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की " ड " वर्गातील, परिचारकांची एकूण ७९५ पदे मंजूर आहेत, त्यापैकी ७५३ पदे भरली आहेत व ४२ पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे नॉर्मनुसार दोन महिन्यात भरण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तसेच वरिष्ठ सहाय्यक (लेखा) एकूण ४१ पदे आहेत, त्यापैकी ५० टक्के पदे सरळसेवा भरतीने तर ५० टक्के पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. वरिष्ठ सहाय्यक (प्रशासन) यांची ५० टक्के पदे पदोन्त्तीची आहेत. सरळसेवा पद्धतीने २५ टक्के भरावयाची ३७ पदे आहेत. त्यापैकी ३४ पदे भरली आहेत. स्पर्धा परीक्षेद्वारे २५ टक्के प्रमाणे ३८ पदे येतात. त्यापैकी २८ पदे भरली आहेत. १० पदे रिक्त आहेत. तर पदोन्नती पद्धतीने ५० टक्क्याप्रमाणे ७५ पदे येतात त्यापैकी ७४ पदे भरली आहेत.

समितीने, वरिष्ठ सहायकाची व कनिष्ठ सहायक (प्रशासन) यामध्ये एकूण किती पदे आहेत, त्यापैकी अनुसूचित जातीची किती पदे भरली आहेत व किती पदे रिक्त आहेत व ही पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा) यांनी समितीस विदित केले की, वरिष्ठ सहायक (प्रशासन) ची एकूण ३७ पदे मंजूर आहेत, त्यापैकी ३५ पदे भरण्यात आली आहेत. अनुसूचित जातीसाठी ५ पदांचे आरक्षण आहे. त्यापैकी ४ पदे भरण्यात आली आहेत व एक पद रिक्त आहे. या सरळसेवेच्या एका पदावरील कर्मचाऱ्याची



दिनांक २३ डिसेंबर २०१४ रोजी अधीक्षक पदी पदोन्नती झाल्याने हे पद रिक्त झाले आहे. नियमित भरतीच्या वेळी सदर पद भरले जाईल. वरिष्ठ सहायक (प्रशासन) या संवर्गाची एकूण ३८ पदे रिक्त असून २८ पदे कार्यरत आहेत. त्यानुसार अनुसूचित जातीसाठी ४ पदे आरक्षित आहेत. त्यापैकी ३ पदे भरण्यात आली आहेत. स्पर्धा परिक्षेव्दारे भरण्यात येणाऱ्या पदांपैकी २ पदे रिक्त असून विभागीय आयुक्त, पुणे यांच्या स्तरावरून सदर भरती प्रक्रिया पार पाडण्यात येते. कनिष्ठ सहाय्यक (प्रशासन) या संवर्गात सरळसेवेची एकूण २९७ व पदोन्नतीची एकूण ९९ पदे मंजूर असून २९० व ९७ ही कार्यरत पदे आहेत. कार्यरत पदानुसार अनुसूचित जातीसाठी अनुक्रमे ३८ व १३ पदांचे आरक्षण असून फक्त १ पद रिक्त आहे. अनुसूचित जातीच्या एका उमेदवाराला पदोन्नती देण्यात आली होती. तथापि, ती त्याने नाकारली आहे. त्यामुळे हे पद रिक्त आहे. सदर पद पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे. ज्या कर्मचाऱ्यांची सेवा ७ वर्षांची झालेली आहे, अशा उमेदवारांची पुढील पदोन्नतीसाठी स्पर्धा परीक्षा घेण्यात येत असते.

यानंतर समितीने, लघुलेखक उच्चश्रेणी, निम्नश्रेणी व लघुटंकलेखकांचे प्रत्येकी १ पद आहे. ही एकाकी पदे असल्यामुळे त्यांना आरक्षण लागू नाही, अशी माहिती दिली आहे. याबाबत अधिक विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा) यांनी सन २००६ च्या शासन निर्णयानुसार एकाकी पदाला आरक्षण ठेवण्यात आलेले नाही अशी माहिती दिली.

यावर समितीने, एकाकी पदाला आरक्षण लागू नसल्याबाबतचा मुद्दा फार महत्वाचा आहे. एकाकी पदासाठी एखादा अनुसूचित जातीचा उमेदवार पात्र असेल, योग्य असेल, गुणवत्ताधारक असेल तर केवळ अनुसूचित जातीचा म्हणून नव्हे तर पात्र उमेदवार म्हणून त्याला पदोन्नतीची संधी दिली पाहिजे. खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या पदावर आरक्षण असलेल्या प्रवर्गातील उमेदवाराची नियुक्ती करणे बंधनकारक नसल्याने तसेच पदे एकाकी ठेवली असल्यामुळे आरक्षण लागू होत नाही व त्यामुळे मागासवर्गीयांना संधी मिळत नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेचा आकृतीबंध बदलला पाहिजे. मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता असा बदल करणे गरजेचे आहे. संपूर्ण जिल्हा परिषदेचा व्याप लक्षात घेता आणि येथील अधिकाऱ्यांची पदे लक्षात घेता लघुलेखकांच्या प्रत्येक संवर्गात केवळ एकच पद आकृतीबंधात आहे, हे योग्य नाही. त्यामुळे या पदांमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. नवीन पदे निर्मितीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने शासनाकडे पाठवावा व त्यासाठी समितीच्या या चर्चेचा संदर्भ द्यावा. या माध्यमातून अनुसूचित जातीच्या उमेवारांना न्याय मिळू शकेल असे मत प्रस्तुत केले.

समितीने, उप शिक्षक संवर्गातील ८८०२ मंजूर पदांपैकी अनुसूचित जातीची ११२० पदे भरण्यात आलेली आहेत, परंतू २५ पदांचा अनुशेष बाकी असल्याबाबत खुलासा करण्यास सांगितले असता सदरची भरती केंद्रीय शिक्षक भरती पूर्व परीक्षा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत होत असते व राईट टू एज्युकेशन कायदा मंजूर झाल्यानंतर पदसंख्येमध्ये बदल झालेला आहे. तसेच, याबाबत न्यायालयीन प्रकरण सुरू असून साधारणपणे १० विद्यार्थ्यांसाठी १ शिक्षक असावा की, २० विद्यार्थ्यांसाठी १ शिक्षक असावा, या संदर्भात अद्याप न्यायालयाने निर्णय घेतलेला नसल्याने हा निर्णय झाल्यानंतर या परीक्षा होतील व ही पदे भरली जातील, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली. उप शिक्षकांची सर्व पदे सरळसेवेने भरली जातात, एकूण ८८०२ मंजूर पदांपैकी १३ टक्क्यानुसार अनुसूचित जातीसाठी ११४५ पदे आरक्षित आहेत. परंतु, कार्यरत पदांची संख्या ८५५२ असून १३ टक्क्यानुसार आरक्षित पदे १११२ एवढी आहेत. त्यापैकी अनुसूचित जाती प्रवर्गातून ११२० पदे भरण्यात आली आहेत. मंजूर पदानुसार २५ पदांचा अनुशेष दिसत असला तरी कार्यरत पदानुसार ८ पदे अधिक भरल्याचा खुलासाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केला.

समितीने, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख, उप शिक्षक व विस्तार अधिकारी या पदांबाबत बिंदू नामावली नोंदवही तपासणीचे कामकाज सुरू असल्याचा शेरा नमूद केला आहे. सदरची तपासणी वेळोवेळी का करून घेतली नाही? अशी विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी समितीस अशी माहिती दिली की, जोपर्यंत शिक्षकांचे प्रमाण ठरत नाही तोपर्यंत ही पदे भरता येत नाहीत. उप शिक्षक, केंद्र प्रमुख आणि मुख्याध्यापक यांचे प्रमाण एकमेकांवर अवलंबून आहे. आज मोठ्या प्रमाणावर खाजगी शाळा सुरू होत आहेत व लोकांचा ओढा या खाजगी शाळांकडे आहे. आमच्या स्तरावर आम्ही जिल्हा परिषदेच्या शाळांची गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न करीत आहोत. विस्तार अधिकारी आणि केंद्र प्रमुखांची बिंदू नामावली तपासून घेण्यात आली असून शिक्षकांची बिंदू नामावली तपासणीचे काम पूर्ण करता आले नाही. शिक्षकांची ८८०२ पदे ही दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ अखेरची आहेत. दिनाक १ एप्रिल, २०१० पासून राईट टू एज्युकेशन कायदा लागू झाला आहे. सन २०१०-२०११, २०११-२०१२, २०१२-२०१३ व सन २०१४-२०१५ मध्ये आरटीई नुसार शिक्षक संख्या निश्चित केली होती. परंतु, दिनांक १७ डिसेंबर, २०१३ च्या शासन निर्णयानुसार स्थगिती असल्यामुळे तात्पुरते रोस्टर तयार करून ते तपासणी करून घेतलेले आहे. उपशिक्षकांचे रोस्टर पूर्ण झाले असून मुख्याध्यापक व विस्तार अधिकाऱ्यांचे रोस्टर तपासणे बाकी आहे.



यानंतर समितीने, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी जिल्हापरिषदेने कोणते प्रयत्न केले आहेत, याबाबत माहिती विचारली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, जिल्हापरिषदेच्या अधिकाऱ्यांनी जिल्हापरिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी चांगले काम केलेले आहे. पुणे येथील बालेवाडीमध्ये महाराष्ट्रातून मुलांची निवड करण्यात येते. मागील वर्षी ४८ मुले आणि ४० मुलींची सातारा जिल्हापरिषदेअंतर्गत निवड झाली. त्या अगोदर एकूण १६५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती, त्यातील १३० विद्यार्थी सातारा जिल्हापरिषदेच्या शाळेतील होते. आमच्या भागात काडे नावाचे रिमोट एरियामध्ये गाव आहे. त्याठिकाणी योगा आणि मल्लखांब शिक्षक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देतात. जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थी खाजगी शाळेत जात आहेत असे लक्षात आल्यानंतर आयुक्तांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी नऊ कार्यक्रम राबविले. मागील तीन वर्षांपासून आम्ही ते कार्यक्रम राबवीत आहोत त्याची फलश्रृती दिसत आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी विद्यार्थी निवडीमध्ये थोडी घट झाली. परंतु आमचे प्रयत्न सुरू आहेत अशी माहिती समितीला दिली.

समितीने खाजगी शाळांमध्ये अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी १३ टक्केप्रमाणे शिक्षकांची पदे भरली आहेत काय? एखाद्या खाजगी शाळांमध्ये अनुसूचित जाती संवर्गाचा अनुशेष असेल आणि भरती करताना अनुसूचित जातीच्या उमेदवाराला डावलण्यात आले तर आपण कोणती कारवाई करता? अशी विचारणा केली असता, शिक्षणाधिकारी, माध्यमिक यांनी खाजगी शाळेतील १९० पदांचा अनुशेष आहे. तर १२४ पदांचा अनुशेष रयत शिक्षण संस्थेचा आहे आणि ६६ पदे इतर शाळांतील आहेत. सेवानिवृत्तीमुळे पदे रिक्त आहेत. सन २०१४-२०१५ ची संच मान्यता झालेली नाही. खाजगी शाळेने आरक्षण डावलले असेल तर त्या शाळेस मान्यता दिली जात नाही अशी माहिती समितीला दिली.

यावर समितीने, जिल्हापरिषदेमध्ये शिक्षण विभाग आहे आणि या विभागामध्ये प्राथमिक आणि माध्यमिक विभागासाठी स्वतंत्र शिक्षणाधिकारी आहेत. आपल्या जिल्ह्यातील खाजगी शिक्षण संस्थांना आपण मंजुरी देता. आपण अशी मंजुरी देत असताना सदर खाजगी शाळेने अनुसूचित जातीच्या उमेदवारांकरिता १३ टक्केप्रमाणे आरक्षण ठेवले आहे किंवा कसे हे पहावे. जर नियमांचे पालन होत नसेल तर आपण त्यांचे अनुदान थांबवावे. खाजगी शाळांमध्ये अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या पदांवर त्या प्रवर्गातील उमेदवाराची नियुक्ती जिल्ह्यातील खाजगी शाळा बिंदू नामावलीप्रमाणे करतात किंवा कसे, तसेच त्या शाळा नियमांचे पालन करतात किंवा कसे हे पाहण्याची जबाबदारी जिल्हापरिषदेची आहे. कोणत्याही खाजगी शिक्षण संस्थेमध्ये शिक्षकांची नियुक्ती, पदोन्नती ही आरक्षणाप्रमाणे केली जाते किंवा नाही हे तपासण्याची जबाबदारी जिल्हापरिषदेची आहे. जर अशा एखाद्या संस्थेबाबत तक्रारी आल्या तर त्याबाबत शहानिशा करून त्या शाळांचे अनुदान थांबवावे असे समितीने निर्देशित केले.

समितीने, खाजगी अनुदानित शाळांना शासनाकडून अनुदान मिळते. उप शिक्षकांच्या रोस्टरबाबत विभागाने केलेला खुलासा समाधानकारक वाटत नाही. सन २००२ पासून म्हणजे जवळपास १३ वर्षे अनुशेष भरलेला नाही. हा अनुशेष न भरण्याची कारणे काय आहेत? असा मुद्दा उपस्थित केला. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अन्य विभागाचा आकृतीबंध कायम स्वरुपी असतो, परंतु शिक्षकांची निश्चिती दरवर्षी होत असते व दिनांक ३० सप्टेंबर पर्यंत विद्यार्थी संख्या निश्चित केली जाते. कार्यालयाने वेळोवेळी शिक्षकांची निश्चिती करून शिक्षकांची भरती केलेली आहे.

जिल्हापरिषदेतील ९७३ चा अनुशेष एकाच वेळी निघू शकत नाही. आरटीईनुसार २५ टक्के विद्यार्थ्यांना आरक्षण दिले पाहिजे. आपण इन्टॅक्ट कॅपॅसिटीपेक्षा जास्त आरक्षण देऊ शकत नाही. जेवढ्या शिक्षकांची आवश्यकता आहे तेवढे शिक्षक भरणे आवश्यक आहे. सन २००२ पासून भरती केलेली नाही, हा मागासवर्गीयांवर अन्याय आहे. एकूण ९७३ पदांचा अनुशेष आहे. सन २००२ पासून ९७३ उमेदवारांना नोकरी मिळणे आवश्यक होते, परंतु तसे झालेले नाही असे मत समितीने प्रदर्शित केले.

सातारा जिल्ह्यातील शासकीय वसतीगृहाबाबत समितीने विचारणा केली असता सहाय्यक आयुक्त (मावक) यांनी सांगितले की, पाटण, फलटण व कऱ्हाड येथे शासकीय वसतीगृह आहे. दिनांक १६ जुलै, २०१२ रोजी नवीन वसतीगृहांचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आलेला आहे. यावर समितीने आता आपण ज्या ठिकाणी मुला-मुलींच्या वसतीगृहाची आवश्यकता आहे, तेथील प्रस्ताव शासनाला सादर करावेत व त्याची एक प्रत समितीला पाठवावी असा निदेश दिला.

समितीने, जिल्ह्यातील मागासवर्गियांच्या वसतीगृहांची जिल्हापरिषदेच्या अधिकाऱ्यांमार्फत वेळोवेळी तपासणी झाली पाहिजे. या वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुखसोई मिळतात का, हे पाहण्याची जबाबदारी जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांची आहे. वसतीगृहांना भेटी देता त्यावेळी कोणत्या त्रुटी आढळून आल्या. समाजकल्याण अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील वसतीगृहांना रात्रीच्या वेळी अचानकपणे भेट दिली आहे काय? अशी विचारणा केली असता अतिरिक्त कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, दिनांक २६ जून २०१५ रोजी ४४ वसतिगृहांना भेटी दिल्या आहेत. सायंकाळी ५.०० ते रात्रौ ८.०० या वेळेत भेटी देऊन वसतिगृहांची तपासणी केलेली आहे. दर तीन महिन्यांनी क्रॉस चेकींग केले जाते. एका वसतिगृहात विद्यार्थ्यांची क्षमता ४८ होती, परंतु प्रत्यक्षात २५ विद्यार्थी होते. आम्ही त्यांना प्रवेश वाढविण्याच्या सूचना केलेल्या आहेत. कारण आपण त्यांना ४८ विद्यार्थ्यांचे साहित्य पुरवितो. साधारणतः तीन महिन्यांनी सरासरी काढली जाते. विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार वसतिगृहांना अनुदान देण्यात येते. जर अनियमितता आढळून आली तर दंडाची तरतूद आहे.



समितीने, रमाई घरकूल योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधीपैकी १९ कोटी रुपये परत गेले आहेत. हे परत गेलेले पैसे मिळविण्यासाठी जिल्हापरिषदेने प्रयत्न केले आहेत काय? याबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या योजनेंतर्गत दोन कोटी रुपये शिल्लक आहेत. रमाई घरकूल योजनेमध्ये लाभार्थ्यांकडे स्वतःची जमीन असावी अशी अट आहे. त्यामुळे लाभार्थी निवडताना अनेक प्रश्न निर्माण होतात. ज्या लाभार्थ्यांकडे स्वतःची जमीन आहे अशा लाभार्थ्यांने अर्ज केला तर त्यास ताबडतोब या योजनेचा लाभ देऊ शकतो असे नमूद केले.

सातारा जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक उन्नतीकरिता कामे केली जातात. अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी कोणत्या योजना आखलेल्या आहेत? आरोग्य विषयक कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत? नाबार्डच्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना कोणत्या सोयीसुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत? जिल्हापरिषदेच्या उत्पन्नातून २०% रक्कम अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी खर्च केली जाते काय? अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, विशेष घटक योजनेंतर्गत विविध विभागांमार्फत निधी प्राप्त झालेला आहे. समाजकल्याण विभागास विशेष घटक योजनेंतर्गत ६ कोटी १० लाख रुपये प्राप्त झाले. कृषी विभाग व पशुसंवर्धन विभागाला देखील निधी प्राप्त झालेला आहे. अशाप्रकारे विशेष घटक योजनेंतर्गत सन २०१२-२०१३ मध्ये ११ कोटी १५ लाख रुपये, सन २०१३-२०१४ मध्ये ११ कोटी २४ लाख रुपये आणि सन २०१४-२०१५ मध्ये १२ कोटी ६८ लाख रुपये प्राप्त झाले. स्टेट सेक्टरचे फंडींग झालेले आहे, जिल्हापरिषदेचा २० टक्के खर्च झालेला आहे. डीपीडीसीचा खर्च झालेला आहे. सन २०१२-२०१३ मध्ये १९ कोटी ३१ लाख इतका खर्च झालेला आहे. सन २०१३-२०१४ मध्ये २२ कोटी रुपये आणि सन २०१४-२०१५ मध्ये २२ कोटी ८८ लाख इतका खर्च झालेला आहे.

तसेच समाजकल्याण विभागामार्फत ज्या योजना राबविण्यात येतात, त्यामध्ये इयत्ता पाचवी ते सातवी मधील अनुसूचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, इयत्ता आठवी ते दहावी मधील अनुसूचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना. माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करणे (योजनेतर) व माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करणे (योजनांतर्गत), आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य योजना. दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २०१२ मध्ये ४ कोटी रुपये, सन २०१२ मध्ये ४ कोटी ७ लाख रुपये आणि सन २०१४ मध्ये ४ कोटी ५४ लाख ५० हजार इतका खर्च केलेला आहे.

समितीने, जिल्हा परिषदेचा १९ कोटी रुपये निधी अखर्चित राहणे, ही अतिशय गंभीर बाब आहे. लाभार्थ्यांकडे स्वतःची जागा उपलब्ध नसल्यामुळे हा निधी अखर्चित राहिला आहे. मागासवर्गीय लाभार्थी गरीब आहेत. त्यांच्याकडे स्वतःची जमीन असण्याचा प्रश्न उदभवत नाही. अशा प्रकरणात काहीतरी मार्ग काढण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. गावामध्ये अनेक गायरान जमिनी असतात, शासकीय जमिनी असतात, त्यामधील जमीन त्यांना उपलब्ध करून देऊन या योजनेचा लाभ देण्याबाबत वरिष्ठ पातळीवरुन विचार करणे आवश्यक आहे. सातारा जिल्हा परिषदेचा रमाई घरकुल योजनेचा निधी अखर्चित राहून परत गेला आहे. लाभार्थ्यांकडे स्वतःची जमीन नसल्यामुळे हे घडले असल्याची माहिती अधिकाऱ्यांनीच दिली आहे. त्यामुळे यामधून कशाप्रकारे मार्ग काढला पाहिजे हे निश्चित करणे आवश्यक आहे असे मत प्रस्तुत केले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गावठाण विस्तार योजनेअंतर्गत खाजगी जमीन संपादित करून त्यावर प्लॉट पाडून ते प्लॉट अशा लाभार्थ्यांना वितरित करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. दुसरा पर्याय म्हणजे रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना स्वतःची जमीन घेण्यासाठी १ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिल्यास त्यांना या योजनेचा लाभ देता येईल. इंदिरा आवास योजनेप्रमाणे रमाई घरकुल योजनेसही जमीन घेण्यासाठीची योजना लागू करणे आवश्यक आहे, असे नमूद केले.

समितीने सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, लाभार्थ्यांकडे स्वतःची जमीन नसल्यामुळे रमाई घरकुल योजनेचा लाभ त्यांना देता आला नाही व या योजनेसाठी जिल्हा परिषदेला प्राप्त झालेला १९ कोटी रुपयांचा निधी अखर्चित राहून परत गेला आहे. तेव्हा अनुसूचित जातीचे लाभार्थी केवळ जमीन नसल्यामुळे या योजनेपासून वंचित राहू नये, यासाठी इंदिरा आवास योजनेप्रमाणेच रमाई घरकुल योजनेसाठी जमीन विकत घेण्यासाठी लाभार्थ्यांना १ लाख रुपयांपर्यंतचे अनुदान शासनाने द्यावे असे अभिप्राय व्यक्त केले.

समितीने, शासनाने ५-१० वर्षांपूर्वी कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान योजना सुरू केली असून जमीन विकत घेऊन त्याचे वितरण अनुसूचित जाती आणि बौद्ध प्रवर्गातील भूमीहिन लोकांना करण्यात येते. सातारा जिल्ह्यामध्ये या योजनेची अंमलबजावणी झाली आहे काय, आणि झाली असल्यास किती लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे? अशी विचारणा केली असता सहायक आयुक्तांनी ही सबलीकरणाची योजना सन २००५-२००६ पासून सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा प्रचार व प्रसार करण्यात आला आहे. प्रति लाभार्थी जमीन खरेदी करण्यासाठी ३ लाख रुपयांचे अनुदान देण्यात येते. परंतु या जिल्ह्यात या योजनेला प्रतिसाद मिळाला नाही. कारण, बाजारभावाने जमीन खरेदी करावयाची असेल तर ३ लाख रुपयांचे अनुदान अपुरे पडते. त्यामुळे शासन निर्णयात बदल करण्याची आवश्यकता असून तशाप्रकारचा संदर्भ शासनाकडे करण्यात आला आहे असे नमूद केले.



यावर समितीने अनुसूचित जाती व बौध्द प्रवर्गातील भूमिहीन शेतमजुरांना ४ एकर किंवा २ एकर जमीन मिळवून देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत शेतजमीन विकत घ्यावयाची असेल तर शासनाच्या माध्यमातून ३ लक्ष रुपयांचे अनुदान देण्यात येते. तथापि, शासनाने देऊ केलेल्या अनुदानाच्या रकमेतून शेतजमीन उपलब्ध होत नाही. या योजनेची अंमलबजावणी व्हावी व प्रत्यक्षात लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा, या दृष्टीकोनातून अनुदानाच्या रकमेमध्ये वाढ करावी. त्याचप्रमाणे अन्य समाजातील शेतकरी दलितांना जमीन विकण्यास तयार होत नाहीत, ही अडचणही या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये येत आहे असे मत मांडले.

समितीने, जिल्हा परिषदेअंतर्गत विशेष मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यात आला आहे काय? असल्यास, सदर कक्षाकडे किती अधिकारी, कर्मचारी यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत व त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे? अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनाच्या परिपत्रकानुसार सदर जिल्हा परिषदेमध्ये सन २००४ पासून विशेष मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यात आला असून समाजकल्याण अधिकारी हे या कक्षाचे कक्ष प्रमुख आहेत, अशी माहिती दिली.

यानंतर समितीने, मागासवर्गीयांच्या मजूर संस्थेला काम देण्यात येत नाही अशाप्रकारच्या तक्रारी समितीकडे आलेल्या आहेत. त्याबाबत आपले काय म्हणणे आहे? अशी विचारणा केली असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणत्या संस्थेला किती कामे द्यावीत या संदर्भात शासन निर्णय आहे. त्यानुसार कामाचा ३३:३३:३४ असा रेशिओ आहे. ३३ टक्के कामे मजूर सहकारी संस्था, ३३ टक्के कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता संघ आणि ३४ टक्के खुल्या निविदेद्वारे देण्यात येतात. या रेशिओप्रमाणे कामाचे वाटप केले जाते. मागासवर्गीय सहकारी संस्थेसाठी आरक्षण ठेवलेले नाही. आपण या सर्वांना बोलावून कोणती कामे करावयाची आहेत ते वाचून दाखवितो आणि कामाचा चॉईस विचारतो. एकच काम दोन-तीन संस्थांना पाहिजे असेल तर चिठ्ठी टाकून निवड करण्यात येते असे नमूद केले.

समितीने मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनेंतर्गत सन २०१२-२०१३ मध्ये लाभार्थींचे पुरेसे प्रस्ताव प्राप्त न झाल्याने रक्कम रुपये ३०,७६,०६,०० शासनाला सर्मपित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. याचे कारण काय आहे? अशी विचारणा केली असता सहायक आयुक्त (मावक) यांनी नमूद केले की, सन २०१२-२०१३ मध्ये ६ कोटी ३४ लक्ष ५१ हजार रुपये एवढी तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी ३ कोटी रुपये एवढाच खर्च झाला आहे. उर्वरित निधी उपलब्ध झाला नाही. ही राज्य शासनाच्या निधीतील योजना आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध शेतकऱ्यांना दारिद्ररेषेच्या वर आणण्यासाठी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत सन २०१३-२०१४ या वर्षात ४३१.१६ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती. यापैकी ३४५.१२ लक्ष रुपये एवढा खर्च करण्यात आला आहे. सन २०१३-२०१४ मध्ये लोकसभा निवडणूक आचारसंहितेमुळे रुपये ८६,०३,७९८ एवढी रक्कम अखर्चित राहिली. तथापि, ही रक्कम सन २०१४-२०१५ मध्ये खर्च करण्यात आली आहे. सन २०१३-२०१४ मध्ये १०४ लाभार्थी होते. याबाबत यापूर्वी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी, त्यांच्याकडून खुलासे मागवावेत व पुढील कार्यवाही करावी, अशा समितीने सूचना केल्या.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

अनुसूचित जाती कल्याण समितीने जिल्हा परिषद, सातारा येथे दिनांक २९ जून, २०१५ रोजी घेतलेल्या बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासित लेखी माहितीच्या अनुषंगाने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी वर्षनिहाय दलित वस्ती सुधारणा व रमाई आवास योजनेंतर्गत घरकुलांसाठी किती निधी मिळालेला आहे? त्यापैकी किती खर्च केला आणि किती शिल्लक राहिला? प्रत्येक वर्षी निधी शिल्लक राहण्याची कारणे काय आहेत? याबाबत माहिती विचारली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१०-२०११ या काळात रमाई योजनेमध्ये घरकुलांचे उद्दीष्ट ४१६ चे होते. यामध्ये अनुसूचित जाती १५५ व नवबौद्ध २७ अशी एकूण १८२ घरकुलांना मंजुरी मिळाली होती. त्यापैकी प्रत्यक्षात पूर्ण झालेली घरकुले १४४ आहेत. या आर्थिक वर्षात १३ कोटी ९५ लाख रुपये उपलब्ध झाले होते. त्यापैकी १ कोटी २२ लाख रुपये खर्च झाले. या निधीचे वितरण समाजकल्याण विभागाकडून केले जाते. त्याची अंमलबजावणी (पीडीडीआरडीए) पंचायत समिती स्तरावर केली जाते. निधी दिल्यानंतर दोन वर्षापर्यंत निधी खर्च करण्याची मुभा असते. सर्वसाधारणपणे प्रत्येक वर्षाच्या फेब्रुवारी, मार्च महिन्यापर्यंत निधी रिलीज होतो. घरकुल योजनेसाठी भूखंड देण्याची योजना प्रगतीपथावर आहे. इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर ही योजना राबविण्यात येत असून लाभार्थी पात्र असूनही भूखंड



मिळत नाही म्हणून ही योजना यशस्वी होत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, घरकुलांच्या जागेसाठी ५० हजार रुपयांची रक्कम अपुरी पडते. इंदिरा आवास योजनेमध्ये केंद्र शासन १० हजार रुपये देते आणि त्यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा ४० हजार रुपये आहे. सामाजिक न्याय विभागाच्या रमाई योजनेमध्ये ५० हजार रुपये मिळतात. ज्या ठिकाणी भूखंडाची किंमत जास्त आहे अशा ठिकाणी तळ मजला अधिक एक आणि तळ मजला अधिक दोन अशाप्रकारच्या योजनेची तरतूद केलेली आहे. या योजनांची अंमलबजावणी पीडीडीआरडीए मार्फत केली जाते. भूखंडाअभावी लोकांना घरकुलाचा लाभ मिळत नाही. इंदिरा आवास योजनेतून घरकुलाची योजना राबवावयाची म्हटले तर त्यासाठी जमीन उपलब्ध नाही. ग्रामीण निवारा योजनेमध्ये को-ऑर्डिनेटर ऐजन्सी नेमावयाची आहे अशी माहिती दिली.

समितीने यावर ५० हजार रुपयांमध्ये कोठेही जागा मिळत नाही त्यामुळे घरकुलाचा निधी तसाच पडून राहतो. लाभार्थ्यांना घरकुल मिळत नाही आणि दिलेले पैसे खर्चही होत नाही, त्यामुळे सदरचा निधी परत जातो. प्रवर्ग निहाय जमिनीचे दर ठरवावे. खरेदी विक्रीचे दर हे वेगळे असतात. प्रवर्ग निहाय दर ठरवून त्याप्रमाणे रक्कम लाभार्थ्यांना मिळाली पाहिजे. जमीन एक लाख रुपये आणि घरकुलासाठी एक लाख रुपये अशी रक्कम द्यायला हवी. शासनाने केवळ ५० हजार रुपये देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात सांगितले होते की, एक लाख रुपयांत घर देऊ. म्हणून घरकुल योजनेसाठी जमीन विकत घेऊन देण्याची शिफारस समितीला करावी लागेल. तेलंगणा राज्यामध्ये मागेल त्याला घर देण्याची योजना मंजूर करण्यात आली आहे. एका घरकुलासाठी ते राज्य ५ लाख रुपये अनुदान देते. दोन वर्षापूर्वी अस्तित्वात आलेले राज्य जर अशी योजना राबवू शकते तर महाराष्ट्र राज्य का करू शकत नाही? महाराष्ट्रात ९५ हजार रुपये अनुदान दिले जाते. हे संयुक्तिक वाटत नाही. सामाजिक न्याय विभागाने त्या राज्याच्या योजनेचा अभ्यास करून सुधारित योजना राबवावी असे मत व्यक्त केले.

समितीने, जमिनीचे दर शासनाने ठरवून दिलेले आहेत अशा परिस्थितीत शासन घरासाठी किती पैसे देत आहे? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शासन एक लाख रुपये देते. घरकुलांसाठी भूखंड उपलब्ध करून देण्यासाठी को-ऑर्डिनेटर नेमण्याची योजना आहे. घरकुल योजनेमध्ये शौचालयासाठी वेगळा निधी मिळतो, त्याशिवाय नरेगा योजनेतंर्गत काही कामांसाठी निधी मिळतो. सर्वसाधारणपणे १.२५ लाख रुपयांपर्यंत रक्कम दिली जाते. अशा एकूण रकमेमध्ये आपल्याला ही घरकुलाची योजना राबविता येईल. यामध्ये शौचालये, नरेगा अंतर्गत कामे या दोन तीन बाबी आणखी समाविष्ट केलेल्या आहेत. लाभार्थी सध्या ज्या घरात रहात आहेत त्या घराची त्यांनी दुरुस्ती करायची आहे. चांगल्या प्रकारचे, मध्यम प्रकारचे व साधारण घर अशा प्रकारे कार्यवाही करण्यात येईल.

समितीने, विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक व केंद्र प्रमुख या पदांची बिंदू नामावली नोंदवही तपासण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे काय? अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बिंदू नामावली तपासण्यासाठी पाठविली होती. त्यामध्ये काही त्रुटी आढळल्याने ती परत पाठविण्यात आली. आयुक्त कार्यालयाकडून बिंदू नामावली तपासून मिळाली तर पुढील पद भरती करण्यास अडचण येणार नाही असे विदित केले. यावर समितीने बिंदू नामावलीची तपासणी नियमित होत नाही. सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी सहायक आयुक्त कार्यालयाला आदेश द्यावेत. प्रत्येक कार्यालयात जाऊन त्यांनी रोस्टर तपासले पाहिजे. आपल्याकडे रोस्टरचे डिटेल्स असतील. त्यांचा कालावधी संपण्यापूर्वी एक महिना अगोदर संबंधित कार्यालयाला त्या संदर्भात नोटीस द्यावी. त्यांनी रोस्टर सादर केले नाही तर तुम्ही स्वतः त्या कार्यालयात जाऊन रोस्टर तपासून द्या. दोन्ही कार्यालयांनी मिळून काम केले तर प्रक्रिया सुरळीत होणार आहे असे अभिप्राय मांडले.

समितीने, सातारा जिल्ह्यातील खाजगी शाळांनी आरक्षणातील सर्व पदे भरली आहेत किंवा नाहीत? किती पदांचा अनुशेष आहे? सन २०१२ पूर्वीच्या खाजगी शाळांमधील आरक्षणसंदर्भात तपासणी करण्यात आली आहे काय? अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१२ मध्ये खाजगी प्राथमिक शाळेमध्ये अनुसूचित जातीची ८ पदे रिक्त होती. या कालावधीत कर्मचारी निवृत्त झालेले आहेत. आता ९ पदे रिक्त आहेत. या नंतर प्राथमिक शिक्षकांची पदे भरण्याची कार्यवाही केलेली आहे. दिनांक २१ डिसेंबर २०११ मध्ये रोष्टर तपासणी केली असता एकूण ८८ पदांचा अनुशेष आढळून आला होता. दिनांक ३० सप्टेंबर २०१२ रोजी शिक्षक निश्चितीच्या रिक्त पदानुसार एकूण २५० पदांचा अनुशेष आहे. यापैकी अनुसूचीत जाती प्रवर्गातील २५ पदे रिक्त आहेत. सन २०१०-२०११ पासून शिक्षक पदांची भरती केलेली नाही. शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी होत असल्यामुळे शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत. त्यांचे इतरत्र समायोजन करावे लागत आहे, अशी माहिती दिली.

समितीने, सातारा जिल्ह्यात मुला-मुलींच्या वसतिगृहाबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे काय? तसेच ज्या वसतिगृहांनी प्रत्यक्ष विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त संख्या दाखवून अनुदान घेतले आहे किंवा अनियमितता आढळून आली आहे अशा संस्थांवर काय कारवाई करण्यात आली आहे? असा प्रश्न केला असता समाज कल्याण अधिकाऱ्यांनी समितीस माहिती दिली की, सध्या



एकूण १४ वसतिगृहे असून नवीन वसतिगृहाकरिता प्रस्ताव मागविण्यात आला आहे. संपूर्ण प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेला नाही. सातारा जिल्ह्यामध्ये नवीन वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. जेथे जागा उपलब्ध आहे तेथे स्वतःच्या जागेत व ज्या ठिकाणी जागा उपलब्ध नाही तेथे भाड्याच्या जागेवर वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. ज्या वसतीगृहांनी प्रत्यक्ष विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त संख्या दाखवून अनुदान घेतले किंवा अनियमितता आढळून आलेल्या संस्थांवर दंडात्मक कारवाई केली जाते. या संस्थांवर समाज कल्याण अधिकाऱ्यांमार्फत नियंत्रण ठेवले जाते. समाज कल्याण अधिकाऱ्यांनी पुढे असेही विदित केले की, संस्थांमधील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांची बायोमेट्रीक पद्धतीने हजेरी घेतली जाते. त्याशिवाय त्यांना मानधन दिले जात नाही. जिल्हा परिषद, समाज कल्याण विभागामार्फत कार्यरत असलेल्या अनुदानित वसतिगृहांना प्रत्यक्ष दिलेल्या भेटीच्या वेळी आढळून आलेल्या विद्यार्थी संख्येनुसारच अनुदान अदा केले जाते. कोणत्याही वसतिगृहात प्रत्यक्ष विद्यार्थी संख्येपेक्षा जादा संख्या दाखवून अनुदान मंजूर केलेले नाही. शासन निर्णय दिनांक १६ मार्च १९९८ मधील तरतदींनुसार वसतिगृहाला दिलेल्या भेटीच्या वेळी त्रुटी आढळून आल्यास त्यांच्यावर रुपये १,००० पर्यंत दंडात्मक कार्यवाही करून देय अनुदानातून दंडाची रक्कम वसूल करण्यात येते.

समितीने यानंतर, दलित वस्ती सुधार योजनेसाठी आलेला निधी दलित वस्ती मध्येच खर्च झाला पाहिजे. तो निधी बिगर दलित वस्तीमध्ये खर्च होता कामा नये असे सूचित केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

अनुसूचित जाती कल्याण समितीने सातारा जिल्हापरिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी दलित वस्ती सुधार योजनेसाठी शासनाकडून देण्यात येणारा निधी इतर कामांसाठी वापरला जात असल्याचे निदर्शनास आले. तेव्हा, दलित वस्ती सुधार योजनेसाठी आलेला निधी दलित वस्ती मध्येच खर्च झाला पाहिजे. तो निधी बिगर दलित वस्तीमध्ये खर्च होता कामा नये असा अभिप्राय व्यक्त केला.

(१) अनुसूचित जाती कल्याण समितीने विभागीय प्रतिनिधींच्या घेतलेल्या साक्षीच्या वेळी सातारा जिल्हापरिषदेत सन २०१०-११ पासून अनुसूचित जाती प्रवर्गातील शिक्षकांची २५ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले. **सबब, गेल्या पाच वर्षांपासून अनुसूचित जातीची रिक्त असलेली २५ पदे लवकरात लवकर भरून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

(२) सातारा जिल्हापरिषदेमध्ये लघुलेखक, लघु-टंकलेखक ही एकाकी पदे असल्यामुळे सदरच्या पदावर आरक्षण लागू होत नाही. जिल्हापरिषदेचा आवाका पाहता सदर पदे वाढविण्याची आवश्यकता आहे. **अत: सदरची पदे वाढविण्याबाबत जिल्हा परिषदेच्या नवीन आकृतीबंधास शासनाकडून मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

(३) सातारा जिल्हापरिषदेतील " क " आणि " ड " वर्गातील काही तांत्रिक आणि अतांत्रिक पदासाठी चौथी उत्तीर्ण पेक्षा कमी अर्हता आहे. सरळसेवेद्वारे भरती करताना उमेदवारांची लेखी आणि व्यावसायिक चाचणी घेण्यात येते असे समितीला आढळून आले. **सबब या पदासाठी पात्र असलेले उमेदवार चौथीपेक्षा कमी अर्हतेचे असल्यामुळे अशा उमेदवारांची लेखी परीक्षा न घेता फक्त व्यावसायिक गुणवत्ता तपासून त्यांना नोकरीत सामावून घ्यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

(४) शासनातर्फे रमाई घरकूल योजनेसाठी देण्यात येणाऱ्या ५० हजार रुपयांमध्ये कुठेही जागा मिळत नाही त्यामुळे घरकुलाचा निधी परत जातो. लाभार्थ्यांना घरकुल मिळत नाही आणि दिलेले पैसे खर्चही होत नाही. खरेदी विक्रीचे दर हे वेगळे असतात. असे समितीला आढळून आले. **यासंदर्भात समितीची अशी शिफारस आहे की, प्रवर्गनिहाय दर ठरवून त्याप्रमाणे जमीन खरेदीसाठी एक लाख रुपये आणि घरकुलासाठी एक लाख रुपये इतक्या निधीची तरतूद करून सुधारित योजना राबविण्यात यावी.**

(५) सातारा जिल्ह्यात मुला-मुलींसाठी नवीन वसतिगृह सुरू करण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे समितीस अवगत झाले. **सदर प्रस्तावास शासनाने लवकरात लवकर मान्यता देऊन नवीन वसतिगृहे सुरू करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(६) **कर्मवीर** दादासाहेब गायकवाड स्वाभिमान योजना अनुसूचित जाती व बौध्द प्रवर्गातील भूमिहीन शेतमजुरांना ४ एकर किंवा २ एकर जमीन मिळवून देण्यासाठी सुरू करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत शेतजमीन विकत घ्यावयाची असेल तर शासनाच्या माध्यमातून ३ लक्ष रुपयांचे अनुदान देण्यात येते. तथापि, शासनाने देऊ केलेल्या अनुदानाच्या रकमेतून शेतजमीन उपलब्ध होत नाही. **या योजनेची अंमलबजावणी व्हावी व प्रत्यक्षात लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा या दृष्टीकोनातून अनुदानाच्या रकमेमध्ये वाढ करावी अशी समितीची शिफारस आहे.**



**नगरपरिषद, सातारा**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीने पाठविलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने नगरपरिषद, सातारा यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने दिनांक ३० जून २०१५ रोजी नगरपरिषद, सातारा या कार्यालयास भेट देऊन मुख्याधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांकडून अनुसूचित जातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विवीध कल्याणकारी योजनासंदर्भात माहिती घेतली.

समितीने सातारा नगरपरिषदेची स्थापना केव्हा झाली तसेच नगरपरिषदेचा आकृतीबंध तयार करण्यात आला आहे काय? अशी विचारणा केली असता मुख्याधिकारी यांनी, सातारा नगरपरिषदेची स्थापना दिनांक १ ऑगस्ट १८५३ रोजी झाली. नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध तयार करण्यात आला आहे. नगरपरिषदेचे स्वत:चे वेगळे सेवाप्रवेश नियम नाहीत. उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, सरळसेवा व पदोन्नतीचे निकष ठरवून दिल्याप्रमाणे भरती प्रक्रिया पार पाडली जाते. नगरपरिषदेत सर्व संवर्ग मिळून एकूण ७३ पदे रिक्त आहेत. वर्ग-४ ची पदे नगरपरिषदेमार्फत भरण्यात येतात. राज्यसंवर्गाची २७ पदे रिक्त आहेत. वर्ग-४ मध्ये १२४ कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली असून त्यामध्ये ७९ कर्मचारी अनुसूचित जातीतील आहेत, अशी माहिती समितीला दिली.

यानंतर समितीने, अनुसूचित जातीतील अधिकारी व कर्मचारी यांना सेवेत पदोन्नती देण्यासंदर्भात निवड समिती स्थापन करण्यात आली आहे काय? त्या समितीमध्ये अनुसूचित जातीचा प्रतिनिधी आहे काय? अशी विचारणा केली असता मुख्याधिकारी यांनी, वर्ग-३ च्या निवड समितीमध्ये अनुसूचित जातीतील एक प्रतिनिधी, तर वर्ग-४ मधील पदोन्नती संदर्भातील निवड समितीमध्ये दोन सदस्य अनुसूचित जातीतील आहेत, अशी माहिती दिली.

यानंतर समितीने नगरपरिषदेतील सफाई कामगार कायम स्वरुपी आहेत की तात्पुरत्या स्वरुपातील आहेत? अशी विचारणा केली असता, मुख्याधिकाऱ्यांनी हे कायम स्वरुपी पदावरील कर्मचारी आहेत. आकृतीबंधानुसार ११० स्थायी तर १७० अस्थायी कर्मचारी आहेत. सन २०१३-२०१४ मध्ये वर्ग ४ मधील सफाई कामगारांची अनुसूचित जातीमधील १० उमेदवार तर सन २०१४-१५ मध्ये २९ उमेदवार अशा एकूण ३९ उमेदवारांना वारसाहक्काने नियुक्त्या दिल्या आहेत, अशी माहिती दिली.

समितीने यावर सफाई कर्मचारी संवर्गामध्ये हुशार, शिक्षित कर्मचारी असतील तर त्यांना पदोन्नती देण्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करावा, असा अभिप्राय व्यक्त केला.

समितीने खाजगी कंत्राटदारांना सफाईचे काम दिले जाते काय? सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी कशी घेतली जाते? अशी विचारणा केली असता मुख्याधिकाऱ्यांनी विदित केले की, निविदा काढून मजूर संस्थांनाच हे काम दिलेले आहे. नगरपरिषदेची दोन रुग्णालये आहेत. त्याशिवाय वेळोवेळी सफाई कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठीही आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. कर्मचाऱ्यांना ईएसआय योजना लागू नाही, असे असले तरी नगरपरिषदेच्या बजेटमधून त्यांच्या आरोग्याची व्यवस्था केली जाते.

समितीने, सन २०१२-२०१३ चे नगरपरिषदेचे अंदाजपत्रक १००,७९,५८,१३३/-, सन २०१३-२०१४ मध्ये १००,८७,४२,९५६/- व सन २०१४-२०१५ मध्ये १०४,७२,०५,१९६/- एवढे आहे. अनुसूचित जातीतील लोकांच्या कल्याणासाठी वर्षनिहाय अनुक्रमे ७३,००,०००/-, १,२६,००,०००/- व १,८२,००,०००/- एवढी तरतूद करण्यात आली आहे. ही रक्कम ५ टक्के प्रमाणे बरोबर आहे काय? अशी विचारणा केली असता मुख्याधिकाऱ्यांनी विदित केले की, शासनाच्या सन १९८८ च्या परिपत्रकाप्रमाणे शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान वगळून नगरपरिषदेच्या निव्वळ महसुली उत्पन्नाच्या ५ टक्के प्रमाणे तरतूद करावयाची आहे. त्याप्रमाणे ही तरतूद बरोबर आहे यावर समितीने अनुसूचित जातीच्या कल्याणकारी योजनांवर कमी खर्च होतो, हा खर्च आपण वाढविला पाहिजे असे सूचित केले.

समितीला अनेक ठिकाणी असा अनुभव येत आहे की, दलित वस्तीच्या नावाने अन्य ठिकाणी खर्च केला जातो. हा झालेला खर्च दलित वस्त्यांमध्येच झालेला आहे काय? असा प्रश्न उपस्थित केला असता मुख्याधिकाऱ्यांनी नगरपरिषदेमध्ये नगरसेवकांची एक समिती असून त्यांच्याव्दारे ही कामे मंजूर केली जातात. या नगरपरिषदेमध्ये दलित वस्तीच्या नावाने अन्य ठिकाणी खर्च झालेला नाही. तसेच सन २०१४-१५ या वर्षात दलित वस्त्यांच्या सुधारणेसाठी १ कोटी ३६ लाख ४८ हजार इतका निधी प्राप्त झाला. दलित वस्त्यांच्या सुधारणेसाठी कामांची निविदा काढण्यात येते.

समितीने, सातारा नगरपरिषदेने घरकुलाची योजना राबविली आहे काय? अशी विचारणा केली असता मुख्याधिकाऱ्यांनी सातारा नगरपरिषदेने IHSDP ही योजना राबविली आहे. फक्त झोपडपट्टी सदृश्य वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी ही योजना नाही तर ही योजना सर्वांसाठी लागू आहे. या योजनेंतर्गत एकूण १४७३ घरे मंजूर आहेत. त्यापैकी अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांची संख्या ६९६ आहे. घरकुलाची एकूण किंमत १ लाख ९५ हजार ९२६ आहे. सद्या १ हजार १८५ घरकुलांचे बांधकाम सुरू आहे. त्यापैकी ६३२ घरकुलांचे काम पूर्ण झालेले असून ४४ घरकुलांचे वाटप झालेले आहे, अशी माहिती दिली.



**विभागीय सचिवांची साक्ष :**

अनुसूचित जाती कल्याण समितीने सातारा, नगरपरिषदेस दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने अधिक माहिती मिळण्यासाठी दिनांक १३ ऑक्टोबर २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. समितीने सातारा, नगरपरिषदेत वर्ग १ ते ४ मध्ये एकूण किती पदे आहेत यामध्ये अनुसूचित जातीसाठी एकूण किती पदे राखीव आहेत, त्यापैकी किती पदे भरली आहेत व किती पदे रिक्त आहेत अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खालीलप्रमाणे माहिती दिली :—

सातारा नगरपरिषदेमध्ये अनुसूचित जातीचा वर्ग ३ मध्ये ६ पदांचा अनुशेष आहे व वर्ग ४ मधील एका पदाचा अनुशेष आहे. वर्ग ३ मधील ६ पदे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत भरली जाणार आहेत. या पदांकरिता जिल्हाधिकाऱ्यांमार्फत जाहिरात काढण्यात आली आहे. लवकरच ही सर्व पदे भरण्यात येतील. सातारा नगरपरिषदेमध्ये वर्ग ३ व ४ मधील एकूण ७३ पदे रिक्त होती. राज्य संवर्गात २७ पदे आहेत. त्यापैकी ७ पदे राज्यस्तरावर भरण्यात येतात. ५ पदे विभागीय आयुक्तांमार्फत भरण्यात येतात आणि जिल्हाधिकाऱ्यांमार्फत १५ पदे भरण्यात येतात. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत भरण्यात येणाऱ्या पदांकरिता जाहिरात काढण्यात आलेली आहे. विभागीय आयुक्त यांना ही पदे लवकरात लवकर भरण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. वर्ग ३ मधील २९ पदे असून ही पदे भरण्याची कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांमार्फत करण्यात येत आहे.

समितीने अनुसूचित जातीकरिता कोणकोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत व सदर योजनेची कामे कधी पूर्ण करण्यात येतील याबाबतची माहिती विचारली असता विभागीय सचिवांनी माहिती दिली की, सध्या एकूण ४ योजना सुरू आहेत. आयएचएसडीपी, रमाई आवास योजना, दलित वस्ती सुधारणा योजना व प्रधानमंत्री आवास योजना आहेत. आयएचएसडीपी या योजनेची कार्यवाही सुरू असून या योजनेंतर्गत एकूण ४२४ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून त्यापैकी ४४ लाभार्थ्यांना घरकुलाचे वाटप झाले आहे. या योजनेची मुदत माहे मार्च, २०१७ पर्यंत असून घरकुलाचे काम त्या आधी पूर्ण करण्यात येणार आहे. रमाई आवास योजनेमध्ये ११ लाभार्थी मंजूर करण्यात आले आहेत. आयएचएसडीपी या योजनेतून मोठ्या प्रमाणात लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ दिला जातो. आयएचएसडीपी या योजनेत एकूण ६९६ लाभार्थी अनुसूचित जाती या संवर्गातील आहेत. त्यामुळे रमाई योजनेतील लाभार्थ्यांची संख्या कमी आहे. उर्वरित लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेमधून लाभ देण्यात आलेला आहे. या योजनेद्वारे लाभार्थी स्वतः घर बांधणार असतील तर घराच्या कामाच्या रकमेवर त्यांना ६ टक्के या सवलतीच्या दराने कर्ज पुरवठा शासनामार्फत

केला जातो. लाभार्थ्यांना घरे बांधून देण्याकरिता एकूण ४ योजना आहेत. पंतप्रधान आवास योजनेद्वारे लाभार्थ्यांना ६ टक्क्यांपर्यंत कर्ज दिले जाते. दुसरी योजना एसआरए प्रमाणे आहे. तिसऱ्या योजनेमध्ये म्हाडा किंवा इंदिरा आवास योजनेप्रमाणे लाभार्थ्यांना घरे बांधून दिली जातात. चौथी योजना क्लस्टर डेव्हलपमेंटची आहे.

समितीने सन २०१४-२०१५ मध्ये दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत नगरपरिषदेला एकूण किती निधी प्राप्त झाला व किती निधी अखर्चित राहिला आहे, अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी विदित केले की, सन २०१४-२०१५ मध्ये १ कोटी ३६ लक्ष रुपयांचा निधी प्राप्त झाला होता व त्यासाठी एकूण १५ कामे प्रस्तावित करण्यात आली होती. पावसाळ्यात डांबरीकरणाची कामे करता येत नसल्यामुळे कामे सुरू करता आली नाहीत. तथापि, वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. निधी अखर्चित राहिलेला नाही. दलित वस्तीचा निधी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला जातो व जिल्हाधिकाऱ्यांनी त्याचा विनियोग करावयाचा असतो. नगरविकास विभागाने नुकतीच या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा केली आहे. मा. पालकमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली आहे. सर्वसाधारणपणे लोकसंख्येनुसार जिल्हाधिकारी नगरपरिषद किंवा नगरपालिकांना निधी वर्ग करीत असतात व त्यानुसार दलित वस्तीची कामे केली जातात.

समितीने, दलित वस्ती सुधारणा योजना, प्रधानमंत्री आवास योजना या योजनांच्या लाभार्थ्यांना स्वतःचा हिस्सा भरावा लागतो. परंतु, रमाई घरकुल योजनेमध्ये लाभार्थ्यांना स्वतःचा हिस्सा भरावा लागत नाही. असे असेल तरी रमाई घरकुल योजनेच्या जाचक अटी बदलण्याची आवश्यकता आहे असे आपल्याला वाटत नाही काय? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी रमाई घरकुल योजनेमध्ये घरकुलासाठी लाभार्थ्याची स्वतःची जागा असावी, अशा प्रकारची अट आहे. तथापि, स्वतःची जागा नसल्यामुळे अनेक लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे स्वतःची जागा घेण्यासाठी लाभार्थ्यांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. साधारणपणे ५० हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्याचे प्रस्तावित आहे असे सांगितले.

यावर समितीने एवढ्या कमी अर्थसहाय्यामध्ये लाभार्थ्याला जमीन खरेदी करणे शक्य होणार नाही. कारण, घरकुलासाठी किमान १ गुंठा जमिनीची आवश्यकता असते व संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला तर एवढ्या कमी रकमेमध्ये जमीन उपलब्ध होऊ शकणार नाही. त्यामुळे अर्थसहाय्याची ही रक्कम वाढविण्याची आवश्यकता आहे. म्हणून समिती असे सुचवित आहे की, त्या त्या शहरातील जमिनीच्या मुल्यांकनानुसार अर्थसहाय्याची रक्कम ठरविण्यात यावी.



समितीने आपल्या राज्यात विविध घरकुल योजनांच्या माध्यमातून घरकुले देण्याचे काम सुरू आहे. परंतु, ज्यांच्याकडे घरे नाहीत असे सर्व लाभार्थी कधीपर्यंत पूर्ण होणार आहेत? संपूर्ण राज्याचा सर्व्हे करून प्रत्येकाला घरकुल उपलब्ध करून देण्याबाबत कालबद्ध कार्यक्रम आखून उद्दिष्ट निश्चित केले पाहिजे. या दृष्टीने शासनस्तरावर काही विचार सुरू आहे काय? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, ‘ Housing for all ’, ही संकल्पना देशाच्या माननीय पंतप्रधानांनी जाहीर केली आहे. देशातील ज्या कुटुंबांना घरे नाहीत, त्या कुटुंबांना सन २०२२ पर्यंत स्वतःच्या हक्काचे घर कसे देता येईल याचे सर्वेक्षण करावयाचे आहे. राज्यात ज्या ४ योजना आहेत त्या योजनांच्या माध्यमातून ही संकल्पना कशी राबविता येईल, या संदर्भातील प्रस्ताव गृहनिर्माण विभागामार्फत मंत्रिमंडळाला सादर करण्यात येणार आहे.

समितीने सन २०१४-२०१५ मध्ये अनुसूचित जातीच्या बेरोजगारांना अनुदान दिले नव्हते. ते देण्यात आले आहे काय ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी विदित केले की, सन २०१४-२०१५ मध्ये राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाअंतर्गत एकूण १८ व्यक्तिंना स्वयंरोजगारासाठी विविध बँकांकडून कर्ज मंजूर करण्यात आले आहे व त्यापैकी ३ व्यक्ती या अनुसूचित जातीच्या आहेत. हे प्रमाण वाढविण्याच्या सूचना महानगरपालिका आणि नगरपालिकांना देण्यात आल्या आहेत. तसेच, महिला व बाल विकास गटांचे ९ प्रस्ताव मंजूर झाले आहेत. त्यातील ८९ लाभार्थ्यांपैकी २३ अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. या वर्षापासून रोख रकमेऐवजी व्याजाच्या सवलतीच्या रूपाने लाभ देण्यात येणार आहे. ३ लाभार्थ्यांना व्याजाच्या सबसिडीची ११,७८५ एवढी रक्कम बँकांना वितरित करण्यात येत आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

(१) समितीने दिलेल्या भेटीच्यावेळी नगरपरिषदेने शासनाकडून ज्या योजनेसाठी निधीची मागणी केली आहे तो निधी त्याच योजनेवर खर्च न करता इतर कामासाठी खर्च केला असे निदर्शनास आले आहे. ही बाब मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी योग्य नाही असा अभिप्राय दिला. **याबाबत नगरपरिषदेने ज्या योजनेसाठी निधीची मागणी केली आहे त्याच योजनेवर विहित कालावधीत तो खर्च केला जावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

(२) सातारा नगरपरिषदेने घरकुलाची योजना राबविली आहे काय, अशी विचारणा केली असता सातारा नगरपरिषदेने IHSDP या योजनेंतर्गत झोपडपट्टीसदृश्य वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी १,४७३ घरे मंजूर केली असल्याचे समितीला समजले. मात्र

यामध्ये अनुसूचित जातीसाठी असणाऱ्या ६९६ घरकुलांपैकी फक्त ४४ घरांचे वाटप झाले आहे. **अतः उर्वरित घरकुलांचे वाटप लवकरात लवकर करून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

(३) रमाई घरकुल योजनेमध्ये घरकुलासाठी लाभार्थ्याची स्वतःची जागा असावी, अशी अट आहे. तथापि, स्वतःची जागा नसल्यामुळे अनेक लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येत नाही. **त्यामुळे स्वतःची जागा घेण्यासाठी लाभार्थ्यांना रु. ५० हजार अर्थसहाय्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येते. एवढ्या कमी अर्थसहाय्यामध्ये लाभार्थ्याला जमीन खरेदी करणे शक्य होणार नाही म्हणून संबंधित शहरातील जमिनीच्या मुल्यांकनानुसार सदर रक्कम वाढविण्याबाबत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत पाठविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**



## परिशिष्ट-एक
## जिल्हा परिषद, सातारा व नगरपरिषद, सातारा यांचेकडून समितीला प्राप्त झालेली माहिती

# जोडपत्र

## अनुसूचित जाती कल्याण समितीसाठी दयावयाची माहिती

### सातारा जिल्हा परिषद, सातारा

अनुसूचित जातीच्या कर्मचारी यांना देण्यात आलेल्या पदोन्नतीची माहिती दर्शविणारे विवरण

| अ. क्र. | विभागाचे नांव | संवर्गाचे नांव | अनुसूचित जातीच्या कर्मचारी यांना वर्षनिहाय पदोन्नती दिलेली संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | एकूण |
| १ | कृषि विभाग | कृषी अधिकारी | १ | ० | ० | १ |
| २ | | विस्तार अधिकारी (कृषी) | ० | १ | ० | १ |
| ३ | बांधकाम उत्तर विभाग | आरेखक | ० | १ | ० | १ |
| ४ | | कनिष्ठ आरेखक | ० | १ | ० | १ |
| ५ | शिक्षण प्राथमिक विभाग | मुख्याध्यापक | १ | १ | ० | २ |
| ६ | | केंद्रप्रमुख | ० | ३ | ० | ३ |
| ७ | | विस्तार अधिकारी श्रेणी -२ | २ | ० | ० | २ |
| ८ | आरोग्य विभाग | आरोग्य सेवक १० टक्के | ० | ० | ० | ० |
| ९ | | आरोग्य सहाय्यक (पु) | ० | ० | १ | १ |
| १० | | आरोग्य पर्यवेक्षक(पु) | ० | ० | ० | ० |
| ११ | | आरोग्य पर्यवेक्षक(म.) | ० | ३ | ० | ३ |
| १२ | | आरोग्य सहाय्यक (म.) | २ | ० | २ | ४ |
| १३ | ग्रामपंचायत विभाग | ग्रामविकास अधिकारी | १ | ० | १ | २ |
| १४ | पशुसंवर्धन विभाग | व्रणोपचारक | ० | ० | १ | १ |
| १५ | | पशुधन पर्यवेक्षक | ० | १ | ० | १ |
| १६ | सामान्य प्रशासन विभाग | सहाय्यक प्रशासन अधिकारी | १ | ० | ० | १ |
| १७ | | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | २ | ० | २ | ४ |
| १८ | | वरीष्ठ सहाय्यक (प्रशासन) | २ | १ | २ | ५ |



| अ. क्र. | विभागाचे नांव | संवर्गाचे नांव | अनुसूचित जातीच्या कर्मचारी यांना वर्षनिहाय पदोन्नती दिलेली संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | एकूण |
| १९ | सामान्य प्रशासन विभाग | कनिष्ठ सहाय्यक (प्रशासन) | ० | २ | १ | ३ |
| २० | | वाहन चालक | १ | ० | ० | १ |
| २१ | | हावालदार | ० | ० | ९ | ९ |
| २२ | अर्थ विभाग | सहाय्यक लेखाधिकारी | ० | ० | ३ | ३ |
| २३ | | कनिष्ठ लेखाधिकारी | ० | ० | १ | १ |
| २४ | | वरिष्ठ सहाय्यक लेखा | १ | ० | १ | २ |
| २५ | | कनिष्ठ सहाय्यक लेखा | ० | १ | ० | १ |
| एकूण एकंदर | | | १४ | १५ | २४ | ५३ |

जोडपत्र

## अनूसूचित जाती कल्याण समितीसाठी दयावयाची माहिती

### सातारा जिल्हा परिषद, सातारा

जाहिरात प्रसिध्द व जाहिरातीमध्ये अनु.जाती भरती करावयाची पदे दर्शविणारे विवरणपत्र

| अ. क्र. | संवर्गाचे नांव | जाहिरात दिनांक | अनु.जाती मधील भरती भरावयाची पदे | अनु. जातीची भरलेली पदे | जाहिरात दिनांक | अनु.जाती मधील भरती भरावयाची पदे | अनु. जातीची भरलेली पदे | जाहिरात दिनांक | अनु.जाती मधील भरती भरावयाची पदे | अनु. जातीची भरलेली पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०१२-१३ | | | २०१३-१४ | | | २०१४-१५ | |
| १ | कृषि अधिकारी | २४/४/२०१२ | १ | १ | ११ व १२/४/२०१३ | १ | १ | -- | ० | ० |
| २ | विस्तार अधिकारी कृषि | -- | ० | ० | ११ व १२/४/२०१३ | १ | १ | -- | ० | ० |
| ३ | जोडारी | -- | ० | ० | -- | ० | ० | -- | ० | ० |
| ४ | कनिष्ठ यांत्रिकी | -- | ० | ० | -- | ० | ० | -- | ० | ० |
| ५ | पर्यवेक्षिका | -- | ० | ० | -- | ० | ० | -- | ० | ० |
| ६ | विस्तार अधिकारी शिक्षण श्रेणी ३ | -- | ० | ० | ११ व १२/४/२०१३ | २ | २ | -- | ० | ० |
| ७ | औषध निर्माण अधिकारी | -- | ० | ० | -- | ० | ० | -- | ० | ० |
| ८ | आरोग्य सेवक पुरुष ५० टक्के | -- | ० | ० | ११ व १२/४/२०१३ | २ | २ | २३/८/२०१४ | १ | १ |
| ९ | आरोग्य सेवक पुरुष ४० टक्के | -- | ० | ० | ११ व १२/४/२०१३ | ३ | ३ | २३/८/२०१४ | ६ | ६ |
| १० | आरोग्य सेवक महिला | -- | ० | ० | ११ व १२/४/२०१३ | ६ | ६ | २३/८/२०१४ | ५ | ५ |
| ११ | कनिष्ठ आरेखक | -- | ० | ० | -- | ० | ० | -- | ० | ० |
| १२ | कंत्राटी ग्रामसेवक | -- | ० | ० | ११ व १२/४/२०१३ | ६ | ६ | २३/८/२०१४ | ४ | ४ |
| १३ | आरोग्य पर्यवेक्षक | -- | ० | ० | -- | ० | ० | -- | ० | ० |
| १४ | आरेखक | -- | ० | ० | -- | ० | ० | -- | ० | ० |



| अ. क्र. | संवर्गाचे नांव | जाहिरात दिनांक | अनु.जाती मधील भरती भरावयाची पदे | अनु. जातीची भरलेली पदे | जाहिरात दिनांक | अनु.जाती मधील भरती भरावयाची पदे | अनु. जातीची भरलेली पदे | जाहिरात दिनांक | अनु.जाती मधील भरती भरावयाची पदे | अनु. जातीची भरलेली पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०१२-१३ | | | २०१३-१४ | | | २०१४-१५ | |
| १५ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | -- | ० | ० | ११ व १२/४/२०१३ | ७ | ७ | २३/८/२०१४ | १ | १ |
| १६ | वरिष्ठ सहाय्यक लिपीक | -- | ० | ० | -- | ० | ० | -- | ० | ० |
| १७ | पशुधन पर्यवेक्षक | -- | ० | ० | ११ व १२/४/२०१३ | १ | १ | २३/८/२०१४ | १ | १ |
| १८ | कनिष्ठ सहाय्यक लिपीक | २४/४/२०१२ | १ | १ | ११ व १२/४/२०१३ | २ | २ | -- | ० | ० |
| १९ | कनिष्ठ सहाय्यक लेखा | -- | ० | ० | ११ व १२/४/२०१३ | २ | २ | २३/८/२०१४ | १ | १ |
| २० | विस्तार अधिकारी सांख्यिकी | -- | ० | ० | ११ व १२/४/२०१३ | १ | १ | -- | ० | ० |
| २१ | कनिष्ठ लेखा अधिकारी | -- | ० | ० | ११ व १२/४/२०१३ | १ | १ | -- | ० | ० |
| २२ | परिचर | -- | ० | ० | -- | ० | ० | -- | ० | ० |
| | एकूण एकंदर | | २ | २ | | ३५ | ३५ | | ११ | ११ |

परिशिष्ट - अ

सातारा नगरपरिषद सातारा

### मागासवर्गीय कल्याणकारी योजना ५% राखीव निधी सन २०१४-२०१५

| अ.क्र | कामाचे नाव | मंजूर निधी - रुपये |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.३ पाटोळे वस्ती ते खंडोबा मंदीर अखेर आर सी सी गटर व पाईपड्रेन करणे | ४२२१०० |
| २ | पेठ गुरुवार डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन व आण्णा भाऊ साठे समाजमंदिर रंगकाम करणे | ७२४२५ |
| ३ | प्रभाग क्र.७ पेठ मल्हार अंतर्गत ठिकाणी सेमी हायमास्ट दिवे बसविणे | २७५००० |
| ४ | प्रभाग क्र.२ अ जेसीओ कॉलनी प्लॉट नं १०९ महालक्ष्मी मंदीराजवळ सुवासिनी कट्टा बांधणे | ७४२०० |
| ५ | प्रभाग क्र.७ पेठ मल्हार श्री विठ्ठल मंदीर ते मल्हार पेठ अखेर पाईपड्रेन करणे | २३९७७८ |
| ६ | प्रभाग क्र.७ पेठ मल्हार सि स नं २६७ विठ्ठल मंदीर ते सि स नं २२० मल्हार दरवेषी घर अखेर कॉंक्रीट करणे | १२११८३ |
| ७ | यशवंत उद्यान येथे वाचनालयाचा उद्घाटनाचा व आण्णा भाऊ साठे पुतळा अनावरणाचा ग्रेनाईट बोर्ड बसविणे | ६१६२० |
| ८ | आण्णा भाऊ साठे जयंतीसाठी मंडप | १८००० |
| ९ | प्रभाग क्र.७ पेठ गुरुवार १५९ गडकरी घर ते १६० चव्हाण घर अखेर पाईपड्रेन करणे | २४५४० |
| १० | पेठ मल्हार १०८ ते सि स नं १०९ माने घर अखेर पाईपड्रेन करणे | ३१७०० |
| ११ | प्रभाग क्र.७ पेठ शनिवार सि स नं ४६२ अवघडे घर ते २७ माणिक पवार ते बागवान घर अखेर कॉंक्रीट व पाईपड्रेन करणे | ९३३६० |
| १२ | पेठ मल्हार मरीनाना मंदीर अखेर कॉंक्रीट करणे | ४३१७१ |
| १३ | प्रभाग क्र.५ मंगळवार कांबळे घर ते सार्व संडास अखेर रस्ता कॉंक्रीट करणे | ३०७६२५ |
| १४ | प्रभाग क्र.६ पेठ रामचा गोट सि स नं १३४ ते १५० अखेर रस्ता कॉंक्रीट करणे | ११५३२५ |
| १५ | प्रभाग क्र.२ क, ९३ सदरबझार सोनल स्टोअर्स ते इंगवले घर अखेर पाईपड्रेन करणे | २३३६०० |
| १६ | प्रभाग क्र.२ सुयोग सोसायटी प्लॉट नं १ ते ३५६ सदरबझार भणगे ते ३५९ ते भाजी मंडई मुतारी अखेर आर सी सी गटर करणे | २८४१०० |
| १७ | प्रभाग क्र.२, ३५६ सदरबझार ३५६ सदरबझार भणगे ते ३६० रविंद्र जाधव घर अखेर पेव्हर ब्लॉक बसविणे | ९९५५० |
| १८ | पेठ मल्हार सि स नं २२३ माणीक शिंदे घर येथे पाईपड्रेन करणे | २६३९४७ |
| | | २७८१४२४ |

मुख्याधिकारी

सातारा नगरपरिषद, सातारा



## परिशिष्ट - ब

### सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये सुवर्ण जयंती नागरी रोजगार योजनेअंतर्गत व सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत प्राप्त अनुदान

१) स्वयंरोजगार -

| आर्थिक वर्ष | एकुण साध्य उद्दिष्ट | पैकी अनु. जातीचे लाभार्थी | टक्केवारी | दिलेले कर्ज (लाखात) | पैकी अनु. जाती कर्ज (लाखात) | टक्केवारी | एकुण दिलेले अनुदान (लाखात) | पैकी अनु. जाती कर्ज (लाखात) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१२-२०१३ | ५० | १९ | ३८% | ३७.९३ | १४.०० | ३७% | १.४८ | ३.५० | ३७% |
| २०१३-२०१४ | १८ | ७ | ३९% | १५.२८ | ५.४४ | ३६% | ३.८२ | १.३६ | ३६% |
| २०१४-२०१५ | १८ | ३ | १७% | २०.२० | ३.५० | १७% | - | - | - |

२) महिला व बालके विकास गट -

| आर्थिक वर्ष | कर्ज दिलेले एकुण गट | पैकी एकुण सदस्य संख्या | एकुण पैकी अनु. जाती सदस्य | टक्केवारी | एकुण दिलेले कर्ज (लाखात) | पैकी अनु. जाती सदस्याचे कर्ज (लाखात) | टक्केवारी | दिलेले अनुदान (लाखात) | पैकी अनु. जाती सदस्याचे अनुदान (लाखात) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१२-२०१३ | २२ | २३५ | ५५ | २३% | ५२.७० | १२.३० | २३% | १८.४४ | ४.२१ | २३% |
| २०१३-२०१४ | १३ | ६९ | ३२ | ४६% | ३७.०० | १७.१४ | ४३% | १२.९५ | ६.०० | ४६% |
| २०१४-२०१५ | ९ | ८१ | २३ | ३३% | २९.१५ | ७.६२ | ३३% | -- | -- | -- |

३) बचत गट -

| आर्थिक वर्ष | फिरता निधी दिलेल्या गटांची संख्या | एकुण संख्या | पैकी अनु. जाती सदस्य संख्या | टक्केवारी | दिलेला फिरता निधी | पैकी अनु. जाती सदस्यांचा खर्च (लाखात) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१२-२०१३ | २१ | १२७ | ५९ | ४६% | २.५४ | १.१८ | ४६% |
| २०१३-२०१४ | ११ | ९० | ४२ | ४६% | १.८० | ०.८४ | ४६% |
| २०१४-२०१५ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

४) प्रशिक्षण -

| आर्थिक वर्ष | एकुण प्रशिक्षण पूर्ण केलेले लाभार्थी (सन २०१०-११ व २०११-१२ चे प्रशिक्षण | पैकी अनु. जातीचे लाभार्थी | टक्केवारी | एकुण खर्च निधी (लाखात) | पैकी अनु. जातीच्या प्रशिक्षणार्थीचा खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१२-२०१३ | १६६ | ४० | २४% | १.७९ | ०.४३ | २४% |

मुख्याधिकारी

सातारा नगरपरिषद सातारा

परिशिष्ट - क

सातारा नगरपरिषद, सातारा.

दलित वस्ती सुधारणा योजना २०१४-१५

| | | |
|---|---|---|
| १ | पेठ शनिवार तेली खड्डा ते धबधबे ते जाधव ते चिंचणे ते परदेशी चौक ते सावकार ट्रान्सपोर्ट व श्री . जाधव ते परदेशी चौक रस्ता डांबरीकरण करणे | २०२०००४ |
| २ | पेठ गुरुवार अमर जाधव घर ते ॲड सुर्ले घर ते एल.बी.एस.कॉलेज ते ठोंबरे दुकान अखेर रस्ता डांबरीकरण करणे | १०९७२०१ |
| ३ | पेठ गुरुवार ५३० श्री रावखंडे घर ते चव्हाण घर अखेर कॉंक्रीट रस्ता करणे | ७७९१५ |
| ४ | पेठ गुरुवार ५२८ ब चंद्रप्रभा लॉज श्री. रावखंडे घर ते ५२१ श्री रावखंडे घर अखेर कॉंक्रीट रस्ता करणे | ११४५४० |
| ५ | पेठ मंगळवार होलार वस्ती समाज मंदीर ते जगन्न चौगुले घर ते संजय कदम घर व पदमावती मंदीर ते शिंदे घर अखेर रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे | १७५४०३० |
| ६ | पेठ गुरुवार बिफ मार्केट पिछाडीस संरक्षक भिंत बांधणे | ९८५८०० |
| ७ | पेठ गुरुवार ५०९ श्री गोविंद पान्नसरे घर ते डॉ .वाघोलीकर घर मागील बाजूस कॉंक्रीट रस्ता करणे | ९६३०० |
| ८ | वॉर्ड क्र.३२ पेठ गुरुवार सि.स.नं.९८२ श्री घोडके घर ते २९१ गुरुवार श्री दिवाकर घर ते कुपर कारखान्ना रस्ता डांबरीकरण करणे | ११७६४११ |
| ९ | प्रभाग क्र.४ न्नालंदा न्नगर येथील ओढ्यालगत संरक्षक भिंत बांधणे | २०००००० |
| १० | पेठ मल्हार बाटा शु मार्ट चोक ते सि.स.नं.१२२ मल्हार पेठ ते मारुती मंदीर अखेर रस्ता डांबरीकरण करणे | ७१५९६५ |
| ११ | पेठ मल्हार बिफ मार्केट समोरील ओढ्यास पश्चिम बाजूला दक्षिण उत्तर संरक्षक भिंत बांधणे | ५१३००० |
| १२ | पेठ गुरुवार ५०९ श्री गोविंद पानसरे घर ते डॉ वाघोलीकर घर मागील बाजूस कॉंक्रीट गटर करणे | २०१७०४ |
| १३ | पेठ गुरुवार ५१५ श्री सुभाष रावखडे ते ४९४ श्री शंख घर अखेर कॉंक्रीट गटर करणे | १५०९७७ |
| १४ | प्रभाग क्र.१ बन्नसोडे वस्ती येथील ओढ्यालगत संरक्षक भिंत बांधणे | २०००००० |
| १५ | पेठ केसरकर ११४ श्री सासवडे घर ते ११५ केसरकर पेठ न.पा.सार्व संडास अखेर रस्ता डांबरीकरण करणे | ७४४८३५ |
| | | **१३६४८६८२** |

मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद, सातारा



**नागरी दलित वस्ती सुधारणा योजना..**
**जिल्हाधिका-यांकडे सुपूर्द करणे व**
**योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता**
**मार्गदर्शक तत्वे विहित करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र.विघयो-१०२०००/१५१२/प्र.क्र.१८१/नवि-४.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक :- ५ मार्च, २००२.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र.विघयो-१०९४/२४१/प्र.क्र.१९/नवि-४, दि. २४ जानेवारी, १९९६.
२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र.विघयो-१०९७/१६७३/प्र.क्र.४४/९७/नवि-४, दि. ५ फेब्रुवारी, १९९८.

**प्रस्तावना:-**

राज्यातील नागरी क्षेत्रातील विशेष घटक लोकसंख्येच्या कल्याणासाठी शासनाने उक्त संदर्भ क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये "नागरी दलित वस्ती सुधारणा योजना" नावाची योजना सन १९९५-९६ या आर्थिक वर्षापासून सुरु केलेली आहे. या योजनेचे सुधारीत व सर्वकष निकष तसेच योजनेची कार्यपध्दती उपरोक्त संदर्भ क्र.(२) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली आहे.

**०१.** "नागरी दलित वस्ती सुधारणा योजना" योजना ही 'जिल्हास्तरीय' व 'विशेष घटक लाभार्थी' साठीची योजना असल्याने या योजनेच्या तरतूदी विशेष घटक योजनेच्या जिल्हा वार्षिक योजनेमधून उपलब्ध केल्या जातात. अशाच प्रकारची योजना ग्रामीण भागासाठी समाजकल्याण विभागामार्फत देखील राबविण्यात येते. विकेंद्रीकरणाच्या धोरणास अनुसरुन समाज कल्याण विभागाने दि. ४ नोव्हेंबर, २००० च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण भागातील "दलित वस्ती सुधारणा योजना" ही योजना जिल्हापरिषदेकडे वर्ग करण्याचा निर्णय घेतला आहे. याच धर्तीवर नागरी भागातील "दलित वस्ती सुधारणा योजना" या योजनेचे जिल्हा स्तरावरील संनियंत्रण संबंधीत जिल्हाधिका-यांकडे देण्याबाबत तसेच योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता मार्गदर्शक तत्वे विहित करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** "नागरी दलित वस्ती सुधारणा योजना" या योजनेचे यापुर्वी निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करुन या योजनेचे संनियंत्रण जिल्हा स्तरावर करण्यास व ते संबंधीत जिल्हाधिकारी, यांचेकडे सुपूर्द करण्यास तसेच योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे विहित करण्यास शासन यादृारे मान्यता देत आहे.

**मार्गदर्शक तत्वे :-**

१) या योजनेतंर्गत हाती घेण्यात येणा-या कामांसाठी १००% राज्य शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.

२) सदरची योजना राज्यातील केवळ नागरी भागासाठी लागू असून ती जिल्हास्तरीय तसेच विशेष घटक लाभार्थीसाठीची योजना असल्याने त्यासाठी विशेष घटक योजनेच्या जिल्हा वार्षिक योजनेमधून तरतूद होणे आवश्यक राहील. संबंधीत जिल्हा नियोजन व विकास मंडळाने जिल्हयातील नागरी संस्थांची संख्या व त्यांना अनुज्ञेय असलेले कमाल अनुदान लक्षात घेऊन वार्षिक योजनेची आखणी करावी.

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | कमाल अनुज्ञेय अनुदान |
|---|---|---|
| १ | महानगरपालिका | रु. १००.०० लक्ष |
| २ | "अ" वर्ग नगरपरिषद | रु. ५०.०० लक्ष |
| ३ | "ब" व "क" वर्ग नगरपरिषद | रु. २५.०० लक्ष |

३) एका आर्थिक वर्षामध्ये या योजनेतंर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दर्जा निहाय उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे वित्तीय मर्यादेपर्यंत कमाल अनुदान अनुज्ञेय राहील. तथापि, उपरोक्त नमूद करण्यात आलेली कमाल वित्तीय मर्यादा -

(अ) जेंव्हा जिल्हयातील एकूण नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी परिपूर्ण प्रस्ताव विहित मुदतीत जिल्हाधिका-यांकडे सादर न केल्यास अथवा इतर कारणामुळे जिल्हयासाठी उपलब्ध असलेली तरतूद आर्थिक वर्षाअखेर शिल्लक रहात असेल.

अशा अपवादात्मक परिस्थितीमध्ये "शासनाच्या पूर्वसंमतीने", जिल्हयातील इतर विशेष घटक लाभार्थी जनतेला सोई सुविधा देण्याकरिता शिथील करता येईल. मात्र यासाठी संबंधीत जिल्हाधिकारी, यांनी शासनास अशा प्रकारचा स्वयंस्पष्ट व परिपूर्ण स्वतंत्र प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील. आर्थिक निकष शिथील केल्यामुळे संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस त्यांना विहित दराने अनुज्ञेय इतक्या कमाल मर्यादेपर्यंत 'अतिरिक्त अनुदान' एका आर्थिक वर्षामध्ये अनुज्ञेय राहील, व यासाठी संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी अतिरिक्त निधीच्या मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव स्वतंत्रपणे संबंधीत जिल्हाधिकारी. यांचकडे सादर करणे आवश्यक राहील.



४) या योजनेतंर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचीत जाती तसेच नव बौध्दांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसूचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात खाली नमुद करण्यात आलेली नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतील.

५) शहरातील अनुसूचित जाती व नवबौध्द यांचेसाठी आरक्षित प्रभाग तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द नागरीकांचे प्रमाण जेथे तुलनेत अधिक असेल तेथे प्राधान्याने (उतरत्या क्रमाने ) या योजनेतंर्गतची अनुज्ञेय कामे हाती घेण्यात यावीत.

६) **योजनेतंर्गत अनुज्ञेय असलेली कामे :-**

अ) रस्ते, पोच-रस्ते, जोड-रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, सिमेंटीकरण (अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत वस्त्यांकरिता कच्चे रस्ते), नाली बांधकाम, लहान नाल्यावर फरशी बांधणे, विहीर दुरुस्ती तसेच उघडया विहिरीवर कठडे बांधणे, नदीच्या काठावर अथवा डोंगर उतारावर संरक्षक भिंती तसेच कठडे बांधणे, छोटे पूल, पिण्याच्या पाण्यासाठी सोई सुविधा, (हापसा, पाण्याची टाकी) सार्वजनिक उपयोगासाठी मुता-या व शौचालये बांधणे, रस्त्यावरील विजेचे दिवे, बालवाडी, बगीचे, बगीच्यांमध्ये पक्क्या स्वरुपाचे बसवायचे खेळाचे साहित्य, समाज मंदिर, वाचनालय, व्यायामशाळा, दवाखाने,सांस्कृतिक केंद्र, दुकाने, स्मशान भूमीचा विकास ही व या सारखी सार्वजनिक हिताची अन्य कामे हाती घेता येतील.

वरील कामांव्यतिरिक्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस स्थानिक गरजेनुसार एखादे काम या योजनेतंर्गत हाती घ्यावयाचे असल्यास व ते योजनेच्या अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास असे काम शासनाच्या पूर्व संमतीने घेता येऊ शकेल.

ब) या योजनेतंर्गत कामे हाती घेताना "पायाभूत सेवा सुविधांच्या" कामांना प्राधान्य असणे आवश्यक राहील.

क) शहरांच्या मजूर विकास योजनेतील प्रस्तावानुसार अनुज्ञेय असलेली विकास योजनेतंर्गत कामे या योजनेतंर्गत हाती घेता येतील.

ड) या योजनेतंर्गत हाती घेतलेल्या कामांची भविष्यातील दुरुस्ती व देखभाल याचा खर्च स्थानिक संस्थेने स्वतःच्या निधीतून करावा. प्राप्त अनुदान कोणत्याही परिस्थितीत देखभाल अथवा दुरुस्तीसाठी वापरु नये.

७) **<u>अनुदान अनुज्ञेय होण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याची कार्यपध्दती :-</u>**

अ) या योजनेतंर्गत अनुदान अनुज्ञेय होण्यासाठी प्रस्तावित कामांची "निवड व निश्चिती", करणारा संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव असणे आवश्यक राहील.

ब) या योजनेतंर्गत वरील नमूद केल्याप्रमाणे अनुज्ञेय प्रभागामध्ये हाती घ्यावयाच्या बांधकाम विषयक कामांसाठीचे रेखांकन/नकाशे संबंधीत नगरपरिषदे संदर्भात जिल्हा स्तरावरील नगर रचना कार्यालयातील अधिका-यांकडून व महानगरपालिका संदर्भात महानगरपालिकेच्या नगररचना अधिका-यांकडून मंजूर करुन घेणे आवश्यक राहील. जिल्हा स्तरावरील नगररचना कार्यालयाने संबंधीत नगरपरिषदेचा बांधकाम विषयक प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार सुसंगत आहे की नाही हे तपासणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्राधान्याने <u>विकास योजनेचा जमीन वापर व आरक्षणाबाबत सखोल छाननी अपेक्षित आहे.</u>

क) रेखांकन/नकाशे मंजूरीनंतर हाती घ्यावयाच्या कामावरील खर्चाच्या तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास प्रचलित कार्यपध्दतीनुसार नगरपरिषदाबाबत संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अथवा नगररचना विभागातील अंमलबजावणी कक्ष येथील सक्षम प्राधिका-याची तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक राहील.महानगरपालिकांच्या बाबतीत संबंधीत महानगरपालिकेचे 'नगर अभियंता' प्रस्तावास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असतील.

ड) अशा प्रकारे रेखांकन मंजूरी तसेच तांत्रिक मंजूरी प्राप्त करुन तयार करण्यात आलेला प्रस्ताव निधीच्या उपलब्धतेसाठी संबंधीत जिल्हाधिकारी, यांचेकडे सादर करण्यात यावा.

इ) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन आवश्यक त्या सहपत्रांसह निधीच्या मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्यानंतर संबंधीत जिल्हाधिकारी, यांनी प्रस्तावाची सखोल तपासणी करावी. जिल्हयासाठी उपलब्ध असलेली तरतूद लक्षात घेऊन निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तावास



जिल्हास्तरीय समितीची "प्रशासकीय व वित्तीय" मान्यता प्रदान करावी. या योजनेतंर्गत हाती घ्यावयाच्या कामांना पूर्व प्रशासकीय मंजूरी आवश्यक असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत कार्योत्तर प्रशासकीय मंजूरी देण्यात येऊ नये.

८) **<u>प्रस्तावासोबत सादर करावयाची प्रमाणपत्रे:-</u>**

अ) प्रस्तावित कामांसाठी शासनाच्या इतर कोणत्याही योजनेतंर्गत अर्थसहाय्य घेतले नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.

ब) प्रस्तावातील काम ज्या जमिनीवर व्यावयाचे आहे ती जमिन नगरपरिषद/महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र.

क) प्रस्तावित कामांची "निवड व निश्चीती" करणारा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव.

ड) प्रस्तावित काम हे ज्या वस्तीतील अनुसूचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्यापेक्षा अधिक आहे अथवा अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या प्रभागातीलच असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

इ) सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त झालेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशाची प्रत.

ई) बांधकाम विषयक काम असल्यास नगररचना शाखेकडून प्रस्तावित कामाच्या रेखांकन/नकाशांना मंजूरी प्राप्त झाल्याच्या आदेशाची प्रत.

फ) मागील आर्थिक वर्षामध्ये प्राप्त झालेल्या निधीचा पूर्णपणे विनियोग करुन त्याचे विनियोग प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक राहील.

९) **<u>निधी वितरण विषयक कार्यपध्दती :-</u>**

"नागरी दलित वस्ती सुधारणा योजना" या योजनेसाठी उपलब्ध जिल्हानिहाय तरतूदीचे वितरण प्रत्येक आर्थिक वर्षासाठी स्वतंत्रपणे शासनाकडून सर्व जिल्हाधिका-यांना आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस करण्यात येईल. शासनाने वितरीत केलेल्या जिल्हानिहाय तरतूदी प्राप्त झाल्यानंतर जिल्हयातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीचे वितरण निश्चित करण्यासाठी खालील प्रमाणे "जिल्हास्तरीय समिती" जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात येत आहे.

**<u>नगरपरिषदांबाबत :-</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | जिल्हाधिकारी | -- | अध्यक्ष |
| ब) | सहाय्यक संचालक/ नगररचनाकार (संबधित जिल्हा) | -- | सदस्य |
| क) | विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी (संबंधित जिल्हा) | -- | सदस्य |
| ड) | नगरपरिषदांचे मुख्याधिकारी (प्रस्ताव सादर केलेल्या ) | -- | विशेष निमंत्रित. |
| इ) | जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासनाचे अधिकारी. | -- | सदस्य सचिव. |

**<u>महानगरपालिकाबाबतः-</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | जिल्हाधिकारी | -- | अध्यक्ष |
| ब) | महानगरपालिकेतील नगररचना शाखा अधिकारी | -- | सदस्य. |
| क) | विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी (संबंधित जिल्हा) | -- | सदस्य |
| ड) | संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त अथवा त्यांचे प्रतिनिधी | -- | विशेष निमंत्रित. |
| इ) | जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासनाचे अधिकारी. | -- | सदस्य सचिव. |

**(टिपः वित्त विभागाने वेळोवेळी निधी वितरणाविषयक निर्गमित केलेल्या आदेश/सूचनांनुसार निधी वितरणाची दक्षता जिल्हाधिकारी कार्यालयाने घ्यावी.)**

१०) **<u>जिल्हास्तरीय समितीची कार्यकक्षा पढील प्रमाणे असेल :-</u>**

अ) जिल्हा वार्षिक योजनेत उपलब्ध असलेल्या "विशेष घटक योजनेच्या" तरतूदीमधून जिल्हयातील नागरी संस्थांची (महानगरपालिका व नगरपरिषदाची ) संख्या व दर्जा (उदा.'अ', 'ब', 'क' वर्ग नगरपरिषदा ) विचारात घेऊन योजनेच्या निकषानुसार अनुज्ञेय असलेले कमाल अनुदान वितरीत करणे.



ब) जिल्हाधिकारी, यांनी या समितीची प्रत्येक आर्थिक वर्षात किमान तीन महिन्यातून एक बेठक आयोजित करावी.(आवश्यकतेनुरुप जादा बेठका घेण्याची मुभा जिल्हाधिका-यांना असेल.)

क) संबधीत जिल्हयाचे नगररचना शाखेच्या अधिका-यांनी जिल्हयातील नगरपरिषदांकडील बांधकाम विषयक कामकाज असल्यास उपरोक्त परि.(७)(ब) प्रमाणे छाननी करुन अहवाल प्रत्येक बैठकीत द्यावा. महानगरपालिकेबाबत संबंधीत नगर रचना अधिकारी यांची हीच जबाबदारी राहील.

ड) विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी संबंधित जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत उपलब्ध तरतूद पुरेशी आहे काय, हे पाहुन जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या बैठकीत पुरेशी तरतूद उपलब्ध करुन घेण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील रहावे. तसेच संबंधीत नागरी संस्थेने हाती घेतलेले काम योजनेच्या निकषानुसार होत आहे किंवा कसे याबाबत "प्रत्यक्ष स्थळ पाहणी" करुन अहवाल प्रत्येक बैठकीत द्यावा.

इ) जिल्हाधिकारी, कार्यालयातील नगरपालिका प्रशासनाचे अधिकारी यांनी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकांचे आयोजन करणे, इतिवृत्त तयार करणे, तसेच संबंधित जिल्हयातील नागरी संस्थांचे निधी मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव उपरोक्त परिच्छेद-८ मधील कागदपत्रासह जिल्हास्तरीय समितीसमोर मंजूरीसाठी ठेवणे, मान्यता प्राप्त झाल्यानंतर संबंधीतांना कळविणे, इत्यादी कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल प्रत्येक बैठकीत द्यावा.

**तसेच —**

१) जिल्हाधिका-यांमार्फत वितरीत करण्यात आलेला सदरील निधी हा नगरपरिषदाच्या बाबतीत संबधीत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व जिल्हाधिकारी अथवा त्यांचे स्थानिक प्रतिनिधी व जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे नांवे राष्ट्रीयकृत बँकेच्या "संयुक्त बँक खात्यामध्ये" जमा करावा. महानगरपालिकांच्याबाबतीत हा निधी आयुक्त, जिल्हाधिकारी व जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे नांवे राष्ट्रीयकृत बँकेच्या "संयुक्त बँक खात्यामध्ये"जमा करावा. जेणेकरुन हा निधी केवळ या योजनेतंर्गतच्या विहित प्रयोजनासाठीच खर्च होईल.

२) अशा प्रकारे संयुक्त बँक खात्यावर जमा करण्यात आलेल्या निधी हाती घेण्यात आलेल्या कामांच्या प्रगतीनुसार टप्प्या-टप्प्याने खर्च करण्यात यावा. निधीच्या बँक खात्यातील वितरणासाठी वर नमूद केलेल्या अधिका-यांपैकी कोणत्याही दोन व्यक्तींची सही आवश्यक असेल तसेच नगरपरिषदांच्या बाबतीत नगरपरिषद मुख्याधिका-यांची व महानगरपालिकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्तांची सही आवश्यक राहील.

३) हया योजनेतंर्गत नागरी स्थानिक संस्थेस वितरीत करण्यात आलेला निधी संबंधीत आर्थिक वर्षा अखेर खर्च करणे आवश्यक राहील व त्याप्रमाणे "विनियोग प्रमाणपत्रे" एक वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

(अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत विनियोग प्रमाणपत्र सादर करणेसाठी मुदतवाढ देण्यास संबंधीत जिल्हाधिकारी सक्षम असतील मात्र अशा नागरी संस्थांच्या अडचणीची खातरजमा करावी.)

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी त्यांना यापूर्वी वितरीत करण्यात आलेल्या निधीची विनियोग प्रमाणपत्रे सादर न केल्यास पुढील अर्थसहाय्य मंजूर करण्यात येवू नये.

४) वरील प्रमाणे विहित करण्यात आलेल्या निकषानुसार राज्य शासनाकडून वितरीत करावयाचा निधी या योजनेशी संबंधीत विभागाच्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष "२२१७ - नगर विकास, १९१ - स्थानिक संस्था, महानगरपालिका, नगर विकास प्राधिकरणे, नगर सुधार मंडळे, क. सहाय्य पंचवार्षिक योजनेतंर्गत योजना (२३) नागरी भागातील दलित वस्तीमध्ये सुविधा पुरविणे (२२१७११४१)" या लेखाशिर्षाखालील संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्पीय जिल्हानिहाय तरतूदीमधून खर्ची घालण्यात यावा.

११) <u>इतर उपाय योजना :-</u>

या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोणातून संबंधीत जिल्हाधिकारी, यांचेकडे या योजनेच्या जिल्हास्तरावरील "संनियंत्रणाची" जबाबदारी सोपविण्यात येत आहे.

अ) संबंधीत जिल्हाधिकारी यांनी जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या बैठकीत जिल्हयातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या व योजनेची वित्तीय मर्यादा लक्षात घेऊन आपल्या जिल्हयासाठी या योजनेतंर्गत आवश्यक असलेली तरतूद उपलब्ध करुन घ्यावी. तसेच या योजने संदर्भात जिल्हा नियोजन व मंडळाच्या बैठकीत आवश्यक ती माहिती मा. अध्यक्ष व सर्व सदस्यांना उपलब्ध करुन दयावी. एखादया जिल्हयासाठी आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस या योजनेतंर्गत जिल्हा वार्षिक योजनेमध्ये पूर्णपणे तरतूद उपलब्ध करुन घेणे शक्य न झाल्यास जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत उपलब्ध बचतीतून पुर्नविनियोजनाद्वारे आवश्यक ती तरतूद उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करावी.

ब) सर्व जिल्हाधिका-यांनी त्यांचेकडे दर महिन्यास आयोजित करण्यात येणा-या मुख्याधिका-यांच्या बैठकीमध्ये या योजनेच्या प्रगतीचा आढावा घ्यावा/आवश्यकता भासल्यास यासाठी विशेष बैठक बोलवावी व या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात.



क) या योजनेतंर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचा विनियोग विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसारच होईल याबाबतची खबरदारी संबंधीत जिल्हाधिकारी, यांनी घ्यावी व याबाबत काही अनियमितता आढळल्यास त्याचा अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

ड) या योजनेच्या गैरकारभारासंदर्भातील तक्रारींच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील त्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरावर नगर रचना कार्यालयातील अधिका-यांच्या मदतीने आवश्यक ती तांत्रिक व प्रशासकीय चौकशी प्राथमिक स्वरुपात करुन आपला अहवाल शासन परिपत्रक क्र.एमआयएस-१०९८/११४७/प्र.क्र.२६३/८९/नवि-१५,दि.१/११/८९ व एमआयएस-१०९४/७३१/प्र.क्र.१७९/९४/नवि-१५. दि.३०/१२/९४ मधील विहित विवरणपत्रात शासनास पाठविणे आवश्यक राहिल.

इ) या योजनेतंर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी मागील आर्थिक वर्षामध्ये त्यांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचा पूर्णपणे विनियोग करुन "विनियोग प्रमाणपत्र" सादर केल्याशिवाय पुढील अनुदान वितरीत करु नये.

ई) प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये शासनाकडून उपलब्ध झालेल्या जिल्हानिहाय तरतूदीमधून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान वितरीत केल्यानंतर उर्वरित रक्कमेच्या प्रत्यार्पणाचा प्रस्ताव **<u>१५ मार्च,</u>** पुर्वी शासनास खास दूतामार्फत सादर करावा. ज्या जिल्हयांच्या प्रत्यार्पणाचे प्रस्ताव शासनास **<u>१५ मार्च,</u>** पूर्वी प्राप्त होणार नाहीत. अशा जिल्हयांची उर्वरित रक्कम व्यपगत होईल व त्याची सर्व जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकारी, यांचीच असेल याची देखिल नोंद घ्यावी.

ल) सर्व जिल्हाधिका-यांनी या योजनेतंर्गत आपल्या जिल्हयातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत निधीचा वर्षनिहाय तपशील, प्राप्त निधीतून हाती घेतलेली कामे, त्यापैकी पूर्ण कामे, अपूर्ण कामे, खर्च झालेली रक्कम व अखर्चित रक्कम इ. बाबतचा अभिलेख ठेवावा व ही माहिती शासनास तारांकित प्रश्न, कपात सूचना, शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी व मंत्रालयीन स्तरावरील महत्वाच्या बैठकांसाठी आवश्यकतेनुसार तात्काळ उपलब्ध करुन दयावी.

र) प्रत्येक तिमाही बैठकीनंतर संबंधतीत जिल्हाधिकारी यांनी हया नागरी संस्थांनी या योजनेतंर्गत हाती घेतलेल्या कामकाजाच्या प्रगतीबाबतचा अहवाल नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई तसेच सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पाठवावा. अहवालामध्ये नागरी संस्थानिहाय हाती घेतलेल्या कामकाजाचे स्वरुप व संख्या पूर्णत्वाची स्थिती, अडचणी असल्यास त्याबाबतची माहिती दयावी.

म) सदरहू योजनेतंर्गत वितरीत करण्यात आलेला निधी ज्या नागरी स्थानिक संस्था आर्थिक वर्ष समाप्ती अखेर खर्च करु शकणार नाहीत. त्यांची यादी नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई व सामाजिक न्याय सांस्कृतिक कर्य व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना जिल्हाधिकारी यांनी पाठवावी.

शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे सर्व संबंधीतांनी काटेकोरपणे पालन करावे.

प्रस्तुतचा शासन निर्णय समाजकल्याण विभागाच्या अनौ. संदर्भ क्र.१२८/विवयो२,दि.२४.१०.२००१ अन्वये व वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.१२३८/व्यय-३, दि.२३.१२.२००१ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**सही/-**
**(भा. ई. नगराळे)**
**महाराष्ट्र शासनाचे सह सचिव.**

प्रति,

महालेखापाल-१, मुंबई,

महालेखापाल-२, नागपूर,

प्रधान सचिव, नियोजन विभाग, मुंबई -३२.

प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

सचिव, समाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

विभागीय आयुक्त, (सर्व महसूली विभाग)

आयुक्त,सर्व महानगरपालिका.



संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई.

संचालक, नगर रचना पुणे,

सह संचालक, नगर रचना, पुणे,

सर्व उप संचालक, नगर रचना शाखा (सर्व विभाग)

सहाय्यक संचालक/नगर रचनाकार, नगर रचना (सर्व जिल्हे),

संचालक, लेखा कोषागार, मुंबई.

सर्व जिल्हा कोषागार, अधिकारी.

सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,

सर्व विशेष समाज कल्याण अधिकारी,

सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकरी कार्यालये (सर्व जिल्हे)

सर्व जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व जिल्हे)

मुख्याधिकारी,सर्व नगरपरिषदा.

उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,

उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई (व्यय-३, अर्थसंकल्प-३,अर्थसंकल्प-१५),

सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव, कार्यासन अधिकारी, नगर विकास विभाग,

प्रधान सचिव-१ व प्रधान सचिव-२, नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक,

निवडनस्ती (नवि-४) नगर विकास विभाग.

निवडनस्ती (नवि-४) नगर विकास विभाग.

## परिशिष्ट-दोन
## समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त



### पहिली बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक २९ जून २०१५ रोजी जिल्हापरिषद, सातारा येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

१. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. लखन मलिक, वि.स.स.

३. श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.

४. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

५. श्री. रमेश बुंदिले, वि.स.स.

६. श्री. सुजित मिणचेकर, वि.स.स.

७. ॲड. जयदेव गायकवाड. वि.प.स.

८. श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.

९. श्री. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. सुभाष नलावडे, अवर सचिव.

**जिल्हापरिषद, सातारा :**

(१) श्री. नितीन के. पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. पी. बी. पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. रविंद्र शिवदास, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)

(४) श्री. विलास पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(५) श्री. पी. व्ही. अहिरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(६) श्री. देविदास कुलाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक व निरंतर)

(७) श्रीमती स्वाती महादेव इथापे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

सदरहू बैठकीत समितीने जिल्हापरिषद, सातारा यांच्या अंतर्गत असलेल्या जिल्हापरिषद कार्यालयात अनुसूचित जातीच्या उमेदवारांच्या भरती, बढती, आरक्षण व अनुशेषाबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

## दुसरी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक ३० जून २०१५ रोजी कै. भाऊसाहेब माळवदे सभागृह, नगरपरिषद, महाबळेश्वर येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

१. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. लखन मलिक, वि.स.स.

३. श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.

४. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

५. श्री. रमेश बुंदिले, वि.स.स.

६. डॉ. सुचित मिणचेकर, वि.स.स.

७. ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.

८. श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.

९. प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. सुभाष नलावडे, अवर सचिव.

**नगरपरिषद, सातारा :**

श्री. अभिजित बापट, मुख्याधिकारी

श्री. आशिष लोकरे, अतिरिक्त मुख्याधिकारी

श्री. हेमंत जाधव, लेखापाल

श्री. दिलीप चिद्रे, नगर अभियंता

**महसूल आयुक्तालय :**

श्री. यु. एम. घुले, सहायक आयुक्त (समाज कल्याण)

सदरहू बैठकीत समितीने, सातारा नगरपरिषद यांच्या अंतर्गत असलेल्या अनुसूचित जातीच्या उमेदवारांच्या भरती, बढती, आरक्षण व अनुशेषाबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.



## तिसरी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक १३ ऑक्टोबर २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजीत करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

१. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. रमेश बुंदिले, वि.स.स.

३. श्री. सुभाष साबणे, वि.स.स.

४. श्री. इम्तीयाज जलील सय्यद, वि.स.स.

५. श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

६. श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. नंदकुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) श्रीमती मनिषा म्हैसकर, सचिव (२), नगरविकास विभाग

(४) श्री. प्रमोद नलावडे, सचिव, सामान्य प्रशासन विभाग

(५) श्री. दि. दा. डिंगळे, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग

(६) श्री. नितीन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सातारा

(७) श्री. अभिजीत बापट, मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद

(८) श्री. पी. बी. पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सातारा

(९) श्रीमती पुनिता गुरव, शिक्षण अधिकारी, नगरपरिषद, सातारा

सदर बैठकीत समितीने प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव(२), नगरविकास विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग व इतर संबंधित विभागीय अधिकारी यांची साक्ष घेतली.

## चौथी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक २९ मार्च २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजीत करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

१. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
३. श्री. सुधाकर भालेराव, वि.स.स.
४. श्री. रमेश बुंदिले, वि.स.स.
५. श्री. इम्तीयाज जलील सय्यद, वि.स.स.
६. श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
७. श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.
८. श्री. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
२. श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.
३. श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.
४. श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

सदर बैठकीत समितीने प्रारूप अहवालावर चर्चा करून किरकोळ दुरूस्तीसह तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई